मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३०२ ■ बुधवार, १५ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ

## एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्या विहार येथील विभागीय कार्यालयातून राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आमदार दिलीप लांडे, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह महामंडळाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या अभियानाच्या माध्यमातून राज्यभरातील एसटीची बसस्थानके, आगारे, कार्यालये आणि विविध परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, आजचा कार्यक्रम हा केवळ वृक्षारोपणापुरता



मर्यादित नसून भावी पिढ्यांसाठी हिरवा, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्र घडविण्याचा सामूहिक संकल्प आहे. वाढते जागतिक



तापमान, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ, पूर आणि उष्णतेच्या लाटांसारख्या पर्यावरणीय संकटांचा सामना करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.झाडे ही पृथ्वीची फुफ्फुसे असून ती प्राणवायू पुरवतात, कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, तापमान नियंत्रित ठेवतात आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे एक झाड लावणे म्हणजे भविष्यातील अनेक संकटांवर उपाय उभा करणे होय, असेही त्यांनी सांगितले.एसटी महामंडळ हे केवळ प्रवाशांना सेवा देणारे परिवहन माध्यम नसून समाजाशी नाळ जोडलेली सामाजिक संस्था आहे. त्यामुळे समाजहिताचे आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविणे ही देखील एसटीची सामाजिक बांधिलकी असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

वृक्षारोपण करून जबाबदारी संपत नाही, तर प्रत्येक रोप जगविणे, त्याचे संगोपन करणे आणि संरक्षण करणे हे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी "एक कर्मचारी – एक वृक्ष" आणि "एक नागरिक – एक वृक्ष" हा संकल्प प्रत्येकाने स्वीकारावा असे आवाहन केले.

## विलास फडके यांच्या वाढदिवसानिमित्त विहिघर येथे विविध समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : माजी जिल्हा परिषद सदस्य विलास नारायण फडके यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवार 15 जुलै रोजी विहिघर येथे लोक उपयुक्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी सकाळी दहा ते दुपारी अडीच वाजेपर्यंत भव्य आरोग्य शिबिर आणि मोफत औषध वाटप कार्यक्रम यात वजन व्यवस्थापन, रक्तदाब, डायबिटीस, थायरॉईड, हृदय चाचणी, स्त्री आणि पुरुष रोग तपासणी, पीएसए, दंत तपासणी, पीएफटी तपासणी, आयुर्वेदिक तपासणी करण्यात येणार आहे. तसेच मोफत डोळे तपासणी आणि चष्मा वाटप कार्यक्रम



आणि मोतीबिंदू असल्यास मोफत ऑपरेशन करण्यात येईल. सकाळी साडेदहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत शासन आपल्या दारी योजनेअंतर्गत आयुष्यमान योजना, एस आय आर फॉर्म भरणे, उत्पन्नाचा दाखला, पॅन कार्ड, रेशन कार्ड नवीन आणि जुने अपडेट केले जाणार आहे. हा कार्यक्रम राजीप शाळा हनुमान मंदिर विहिघर येथे होणार आहे.

## कला, वारसा आणि आधुनिक सुविधांचा काळा घोडा परिसरात संगम – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** मुंबईचे वैभव असलेल्या काळाघोडा परिसरातील रस्त्यांचे अत्यंत उत्तमरित्या सुशोभीकरण करण्यात आले आहे. सुशोभीकरण कामातून कलात्मक व तत्कालीन वास्तुकलेशी समरसता जपण्यात आली आहे. कला, वारसा आणि आधुनिक सुविधांचा झालेल्या संगमातून या परिसराचे नवे रूप नागरिकांना अनुभवता येणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते काळा घोडा आर्ट एवेन्यू सौंदर्यीकरण कामांचे लोकार्पण काळा घोडा प्लाझा, बी. भरूचा मार्ग येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले.

नागरिकांसाठी असलेली ही



व्यवस्था 'हेरिटेज वॉक' आहे. येथील पाथ वे आणि प्रत्येक जागेला कलात्मक स्पर्श करण्यात आला आहे. अत्यंत सुंदर व्यवस्था आहे त्याच शिस्तीमध्ये सुरू राहावी, यासाठी येथे येणारे नागरिक, येथील व्यावसायिक यांनी दक्षता घ्यावी, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, महापौर रितू तावडे, स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे, मनपा विरोधी पक्ष नेत्या किशोरी पेडणेकर, सभागृह नेते गणेश खणकर, नगरसेवक हर्षिता नार्वेकर, बृन्हमुंबई महानगर पालिका आयुक्त अश्विनी भिडे, बृन्हमुंबई महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्राजक्ता लवंगारे,आदी उपस्थित होते.

**थोडक्यात काळा घोडा परिसर सुशोभीकरण..**

दक्षिण मुंबईतील काळा घोडा परिसर युनेस्कोच्या 'व्हिक्टोरियन गॉथिक अँड आर्ट डेको आसम्बल ऑफ मुंबई' या जागतिक वारसा स्थळाला लागूनच असल्यामुळे मुंबईकरांना हेरिटेज वॉकचा आनंद घेता यावा, यासाठी पाच रस्त्यांचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. यामध्ये परिसरातील साईबाबा मार्ग, रोप वॉक लेन, डॉ. व्ही. बी. गांधी मार्ग, फोर्ब्स स्ट्रीट, रुदरफोर्ड स्ट्रीट व बी. भरुचा मार्ग या रस्त्यांच्या समावेश आहे. येथे संग्रहालये, कला दालने व ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारती आहेत. दरवर्षी भरविला जाणारा काळा घोडा कला महोत्सव या परिसराची सांस्कृतिक ओळख आहे.

बी. भरूचा मार्गावरील चौकात 'प्लाझा' साकारण्यात आला असून करडा आणि काळा ग्रॅनाईट तसेच बेसॉल्ट फरशीचा यासाठी वापर करण्यात आला आहे.या प्लाझाजवळ टेबल-खुर्चीवर बसून मुंबईकर, पर्यटक या परिसराचा, येथील स्वादिष्ट पदार्थांचा आनंद घेवू शकणार आहेत. आकर्षक स्ट्रीट आर्ट भित्तिचित्रे आणि सार्वजनिक बसण्याच्या खास जागा देऊन अधिक पादचारी-स्नेही मार्ग बनविण्याता आला आहे.




## एक तक्रार... अन् भेसळखोरांवर धडक कारवाई !

# धर्माबाद तालुक्यात FDA संपर्क कक्ष उभारण्याची माष्टीचे माजी सरपंच विनोद जोगदंड यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार** : भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे आणि निकृष्ट दर्जाच्या उत्पादनांविरोधात प्रभावी कारवाई व्हावी तसेच नागरिकांना सहजपणे तक्रार नोंदविता यावी, यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात अन्न व औषध प्रशासन (FDA) संपर्क कक्ष सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभर भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे, निकृष्ट दर्जाची उत्पादने, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल्स, खाद्य व्यवसायिक आणि विविध कंपन्यांविरुद्ध धडक कारवाई सुरू केली आहे. त्यांच्या कठोर व पारदर्शक कार्यपद्धतीमुळे भेसळ करणाऱ्यांमध्ये मोठी भीती निर्माण झाली असून, सर्वसामान्य



नागरिकांमध्ये अन्नसुरक्षेबाबत जागरूकता वाढत आहे.

आयुक्त तुकाराम मुंढे यांनी नागरिकांना संशयास्पद अन्नपदार्थ, भेसळ, बनावट औषधे किंवा नियमभंग आढळल्यास तत्काळ तक्रार करण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग मिळाल्यास भेसळ रोखण्यासाठी अधिक प्रभावी कारवाई करता येईल, असा त्यांचा भर आहे.

याच पार्श्वभूमीवर धर्माबाद तालुक्यात तहसील कार्यालय, नगरपालिका किंवा नगरपरिषद येथे FDA संपर्क कक्ष स्थापन करण्याची मागणी माष्टीचे माजी सरपंच विनोद जोगदंड पाटील यांनी केली आहे.




अशा संपर्क कक्षामुळे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना तक्रार नोंदविणे, अन्न व औषधांचे नमुने तपासणीसाठी सादर करणे, संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधणे आणि भेसळीच्या प्रकरणांवर तातडीने कारवाई होण्यासाठी मदत होईल.

विनोद जोगदंड पाटील यांनी ही मागणी पुढे रेटत सांगितले की, तालुका स्तरावर FDA संपर्क कक्ष सुरू झाल्यास नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. तसेच भेसळीविरोधातील मोहिमेला अधिक बळ मिळून ग्रामीण भागापासून ते मुंबईच्या किनारपट्टीपर्यंत अन्नसुरक्षा मजबूत होईल.

राज्यात भेसळमुक्त अन्नव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रशासनाची कठोर भूमिका आणि नागरिकांचे सक्रिय सहकार्य या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे प्रत्येक तालुक्यात FDA संपर्क कक्षाची स्थापना हा काळाची गरज असून, भेसळमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते, असे मत धर्माबाद च्या जनतेतून होत आहे.

## लोढा हेवन परिसरातील रस्त्यांवरील खड्डे चक्क खडी टाकून बुजवले; नागरिकांनी व्यक्त केली नाराज



**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत ग्रामीण प्रतिनिधी** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील लोढा हेवन परिसरात पावसामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते या खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता . दरम्यान, संबंधित विभागाने या खड्ड्यांमध्ये डांबरीकरण करण्याऐवजी चक्क खडी टाकून तात्पुरती दुरुस्ती केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे छोट्या वाहनांना अजूनही जास्त गाडी चालवताना त्रास सहन करावा लागत आहे या प्रकारामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त करत, खडी पावसाच्या पाण्यामुळे वाहून जात असून पुन्हा खड्डे पडण्याची शक्यता आहे अपघाताचा धोका सुद्धा नाकारता येत नाही त्यामुळे केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता रस्त्यांची दर्जेदार आणि कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकां कडून होत आहे आता कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासन याची गंभीर दखल घेऊन योग्य ती कारवाई करणार का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# द्रोणागिरीतील सलूनमध्ये महिलेचा विनयभंग !

## युनिक युनिसेक्स सलून' तात्काळ बंद करा - नागरिकांची संतप्त मागणी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. उरण पोलीस ठाणे हद्दीतील द्रोणागिरी येथील देवकृपा बिल्डिंगमध्ये असलेल्या "युनिक युनिसेक्स सलून" या दुकानात हेअर वॉशसाठी गेलेल्या एका महिलेचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पोलिस अधिकृत सूत्रकडून मिळलेल्या माहिती नुसार दिनांक 12/07/2026 रोजी सकाळी 11.00 ते 11.30 च्या दरम्यान सदर महिला सलूनमध्ये हेअर वॉश करण्यासाठी गेली होती. त्यावेळी तेथे काम करणाऱ्या सोहेल शमशाद शेख, वय 21 वर्ष, राहणार द्रोणागिरी या इसमाने महिलेशी अश्लील वर्तन करून तिचा विनयभंग केला. महिलेच्या




तक्रारीनंतर उरण पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले आहे.

पोलिस अधिकृत सूत्रकडून मिळलेल्या माहिती नुसार दिनांक 12/07/2026 रोजी सकाळी 11.00 ते 11.30 च्या दरम्यान सदर महिला सलूनमध्ये हेअर वॉश करण्यासाठी गेली होती. त्यावेळी तेथे काम करणाऱ्या सोहेल शमशाद शेख, वय 21 वर्ष, राहणार द्रोणागिरी या इसमाने महिलेशी अश्लील वर्तन करून तिचा विनयभंग केला. महिलेच्या तक्रारीनंतर उरण पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले आहे.

या घटनेमुळे द्रोणागिरी आणि परिसरातील महिला वर्गात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. "युनिसेक्स" च्या नावाखाली महिला आणि पुरुष दोघांसाठी एकाच ठिकाणी सेवा देणे हेच मुळात धोकादायक आहे. अशा ठिकाणी महिला सुरक्षित नाहीत आणि त्यांच्या अब्रूला धोका आहे.स्थानिक नागरिकांचा सवाल आहे की, महिलांसाठी स्वतंत्र केबिन, महिला कर्मचारी किंवा किमान CCTV सारख्या मूलभूत सुरक्षा व्यवस्था नसताना अशा सलूनना परवानगी कशी मिळते? पैशासाठी महिलांच्या सुरक्षिततेशी खेळणाऱ्या अशा दुकानांवर त्वरित कारवाई झाली पाहिजे.

या प्रकरणानंतर उरण आणि द्रोणागिरीतील नागरिकांनी मागणी केली आहे की, "युनिक युनिसेक्स सलून" सारखी सर्व अनधिकृत आणि असुरक्षित सलून तात्काळ बंद करावीत. महिलांच्या सन्मानाशी खेळणाऱ्यांना कडक शासन झाले पाहिजे आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी पोलीस प्रशासनाने सर्व सलूनची तपासणी करून कठोर नियम लागू करावेत. सध्या तरी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही, मात्र महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# नवनियुक्त नागपूर ग्रामीण अध्यक्ष सलील देशमुख यांचे सामाजिक न्याय विभागातर्फे भव्य स्वागत

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवनियुक्त नागपूर ग्रामीण अध्यक्ष (शरदचंद्र पवार) श्री. सलील देशमुख यांची नियुक्ती झाल्याबद्दल पक्षाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे त्यांच्या जीपीओ चौकातील जनसंपर्क कार्यालयात भव्य स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष शेखर पाटील यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

समारंभात श्री सलील देशमुख यांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या



नेतृत्वाखाली नागपूर ग्रामीण भागातील पक्ष संघटनेला नवे बळ मिळेल व जनहिताच्या प्रश्नांवर संघटना अधिक प्रभावीपणे काम करेल, असा विश्वास उपस्थित वक्त्यांनी व्यक्त केला.

सलील देशमुख यांनी आपल्या भाषणात पक्षनेतृत्व, सामाजिक न्याय विभाग व सर्व अधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त करून प्रत्येक गावापर्यंत संघटन मजबूत करून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पूर्ण निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे सांगितले.

यावेळी निरीक्षक मुनाज शेख व राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते (शरदचंद्र पवार) शैलेंद्र तिवारी, वर्षा शामकुडे, बाबुराव येरणे, रुद्र धाकडे, दया शंकर दुबे, अझहर पटेल, धम्मपाल वानखेडे, दिलीप उके आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी, सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी, विविध सेलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते व नवनियुक्त ग्रामीण अध्यक्ष श्री.सलील देशमुख यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशस्वी व लोककल्याणकारी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे वातावरण उत्साह, एकोपा आणि संघटनात्मक एकतेने भरलेले होते.

# कै. कमळू पाटील यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त कीर्तन सोहळा व अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते तसेच कमल गौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेचे चेअरमन बबनदादा पाटील यांचे वडील कै. कमळू पाटील यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ रोजी कै. कमळू पाटील हायस्कूल, तळोजे मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड येथे धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.०० वाजता कै. कमळू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर सकाळी



१०.०० ते १२.०० या वेळेत ह.भ.प. श्री. लालचंद महाराज राजे यांच्या सुश्राव्य कीर्तनाने उपस्थितांना अध्यात्म, संस्कार आणि समाजसेवेचा संदेश दिला. या कीर्तनासाठी सद्गुरु वामनबाबा पायी दिंडी (रायगड-ठाणे परिसर) यांचीही उपस्थिती लाभली.

या स्मृतिदिनानिमित्त नातेवाईक, मित्रपरिवार, गावातील वारकरी बांधव, नागरिक, शाळेचे विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी तसेच शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी कै. कमळू पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

बबनदादा पाटील हे दरवर्षी आपल्या वडिलांचा स्मृतिदिन श्रद्धा, भक्तीभाव आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करतात. या परंपरेतून धार्मिक संस्कार, समाजातील एकोपा आणि सेवाभावाचा संदेश दिला जात असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

कार्यक्रमानंतर सर्व वारकरी, नागरिक, मान्यवर आणि उपस्थित भाविकांसाठी महाप्रसाद व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

संपूर्ण कार्यक्रम शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# मांझरखेड येथे कृषी विद्यार्थ्यांकडून शेतकऱ्यांना फळबाग लागवडीच्या आधुनिक पद्धतींचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** फळबाग लागवडीत उत्पादन वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी अमरावती येथील 'श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय' च्या विद्यार्थ्यांनी मांझरखेड कसबा येथे विशेष मार्गदर्शन शिबिर आयोजित केले.

ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव `RHWE` कार्यक्रमांतर्गत दि. 9 जुलै 2026 रोजी सकाळी हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी थेट शेतावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत फळबाग लागवडीच्या नवीन आणि अधिक कार्यक्षम पद्धतींची माहिती दिली.

**प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम**

हा अभिनव उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि परवानगीने पार पडला.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी *प्रज्वल गावंडे, ऋषिकेश मर्डीकर, प्रज्वल गजिभ्ये, शुभम अमझरे, सार्थक कराळे आणि सुजल मुळे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**प्रात्यक्षिकांद्वारे शंकांचे निरसन**

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी चार्ट्स आणि पोस्टर्सच्या माध्यमातून फळबाग लागवडीच्या आधुनिक पद्धती समजावून सांगितल्या. यामध्ये खालील मुद्द्यांवर भर देण्यात आला:

- *लागवडीचे तंत्र*: जमिनीची निवड, खड्ड्याचा आकार आणि अंतर
- *रोपांची निवड*: रोगमुक्त आणि दर्जेदार रोपे कशी निवडावीत
- *पाणी व्यवस्थापन*: ठिबक सिंचनाचा वापर आणि त्याचे फायदे
- *खत व्यवस्थापन*: सेंद्रिय आणि रासायनिक खतांचा योग्य वापर

शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकाद्वारे निरसन केले. पारंपरिक पद्धतीऐवजी आधुनिक पद्धती अवलंबल्यास खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ कशी होते, हे देखील समजावून देण्यात आले.

**शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

या मार्गदर्शनाला स्थानिक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. विद्यार्थ्यांनी दिलेली माहिती आणि प्रात्यक्षिके उपयुक्त असल्याचे सांगत शेतकऱ्यांनी अशा प्रकारचे कार्यक्रम सातत्याने व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

महाविद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले की, RHWE अंतर्गत विद्यार्थी गावागावात जाऊन शेतीविषयक नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम करत आहेत.

## ओझर नगरपरिषद प्रभाग १२ मध्ये शासकीय सेवा शिबिर व मतदार मॅपिंग कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**ओझर प्रतिनिधी :** ओझर नगरपरिषद प्रभाग क्रमांक १२ मध्ये नगरसेविका सौ. दिपाली रविंद्र शिंदे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या शासकीय सेवा शिबिराला आणि मतदार मॅपिंग कॅम्पला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

साईधाम, साई मंदिर येथे झालेल्या या कॅम्पमध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती तसेच आवश्यक सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या.



मतदार नोंदणी, नाव-दुरुस्ती यांसारख्या कामांसाठीही विशेष काउंटरची व्यवस्था करण्यात आली होती.या उपक्रमास सर्कल अधिकारी, तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामविकास अधिकारी यांच्यासह रवी शिंदे उपस्थित होते. नागरिकांच्या सोयीसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमात प्रभागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## महेश साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त पूर्वतयारी बैठक संपन्न

### स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या रायगड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची पनवेलमध्ये उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या युथ रिपब्लिकनचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांचा वाढदिवस 8 ऑगस्ट 2026 रोजी विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्याच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी बैठक पनवेल येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. बैठकीत वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांबाबत चर्चा करून नियोजन करण्यात आले.

बैठकीला पक्षाचे ज्येष्ठ नेते बाबा नाईक, पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, पनवेल शहर अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष आसिफ शेख, महिला आघाडीच्या अध्यक्षा ममताज पठाण, पनवेल तालुका उपाध्यक्ष नरेश परदेशी, पनवेल तालुका अध्यक्ष दिलीप नाईक, पनवेल शहर संघटक समाधान कांबळे, शहर कार्यकारिणी सदस्य मनोज कांबळे, शिवाजी कांबळे, नवीन पनवेल शहराध्यक्ष अशोक कदम, उपाध्यक्ष किशोर कदम, केशव ओव्हाळ, जावेद मास्टर, पनवेल शहराध्यक्ष प्रशांत सोनवणे, चंद्रकांत वेळासकर, मयूर गायकवाड, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष विजय धोत्रे, पेण तालुका अध्यक्ष



अमित कांबळे, महाड तालुका अध्यक्ष सुजित जाधव, माणगावचे रायगड जिल्हा संघटक राजेश हाटे, शहराध्यक्ष सुनील जाधव तसेच महिला आघाडीच्या पदाधिकारी, युवक कार्यकर्ते आणि रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीत विविध जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले असून 8 ऑगस्ट रोजी होणारा वाढदिवस सोहळा उत्साहात आणि सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी उपक्रम! सारडे जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना छत्री व वह्यांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**उरण रायगड प्रतिनिधी रणिता ठाकूर** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देत पावसाळ्यात त्यांची गैरसोय दूर करण्याच्या उद्देशाने इन्नर व्हील क्लब ऑफ बॉम्बे डाउनटाउन यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा, सारडे येथील विद्यार्थ्यांना छत्री आणि वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या उपक्रमाचे आयोजन क्लबच्या अध्यक्षा हेतल खोना, सचिव भारती विक्रमसी, डिस्ट्रिक्ट चेअरमन मोना ग्यानी, असोसिएशन प्रेसिडेंट व एनआर विनुथा हरीश तसेच आय.आय. डब्ल्यू. प्रेसिडेंट इंगेलाँग विंधाम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाला इन्नर व्हील क्लबच्या अध्यक्षा हेतल खोना, आकाश फाउंडेशन, मुंबईच्या सचिव संजीवनी श्रृंगारे, सारडे विकास मंचाचे अध्यक्ष






नागेंद्र म्हात्रे, नितीन म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, गणेश पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनायक म्हात्रे, उपाध्यक्षा कविता म्हात्रे, उज्वला पाटील, पूनम पाटील, ज्योत्स्ना पाटील, तसेच शाळेच्या शिक्षिका अपूर्वा मॅडम, रश्मी मॅडम, सुनीता पाटील आणि इतर शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना क्लबच्या अध्यक्षा हेतल खोना यांनी सांगितले की, "समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक ती मदत करणे आणि निस्वार्थ भावनेने सामाजिक सेवा करणे हेच इन्नर व्हील क्लबचे प्रमुख ध्येय आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी अशा उपक्रमांना आम्ही सातत्याने प्राधान्य देत राहू."

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या शिक्षिका अपूर्वा मॅडम यांनी इन्नर व्हील क्लब ऑफ बॉम्बे डाउनटाउनच्या अध्यक्षा हेतल खोना आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणारे असे उपक्रम त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवी ऊर्जा आणि प्रेरणा देणारे ठरतात, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.हा उपक्रम सामाजिक बांधिलकी, शिक्षणप्रेम आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली संवेदनशीलता यांचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

# थोडक्यात

## फार्मासिस्ट म्हणून नोकरीला लावतो असे सांगून केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** फार्मासिस्ट म्हणून नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून सहा लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी रामेश्वर नारायण पवळ (राहणार कापीलानगर, अकोला) आणि कैलास अर्जुन मुंडे (राहणार देवगाव, केज, बीड) यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 13 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील आरोपी कैलास मुंडे याला अटक करण्यात आली. फिर्यादी यांच्या पतीकडून महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात फार्मसिस्ट म्हणून नोकरी लावून देण्याचे अमिष दाखवून दोघांनी सहा लाख रुपये घेतले आणि त्यांना नोकरी लावून दिली नाही. यावेळी फिर्यादी यांनी पैसे परत मागितले असता ते परत न करता त्यांची फसवणूक केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी कैलास मुंडे याला अटक केली. दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. याप्रकरणी अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार करत आहेत.

## 21 हजार 500 रुपयांचे मदय जप्त

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** कामोठे पोलिसांनी मोठा खांदा गावात छापा टाकून 21 हजार पाचशे रुपयांचे मद्य जप्त केले. 13 जुलै रोजी मोरेश्वर मीनानाथ भगत (वय 38) याने तो रोहत असलेल्या घरासमोरील गल्लीत 21 हजार पाचशे रुपये किमतीचे मद्य बाळगल्या प्रकरणी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## हुंडा मागून त्रास दिल्या प्रकरणी चौघाविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** महिलेकडून हुंडा मागून तिला शारीरिक आणि मानसिक त्रास दिल्याप्रकरणी पती, सासू, सासरे, नणंद यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 13 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी यांनी समुपदेशन साठी पोलीस ठाण्यात अर्ज केला होता. मात्र समुपदेशन अयशस्वी झाल्याने त्यांनी पोलीस ठाण्यात चौघाविरोधात गुन्हा दाखल केला. फिर्यादीला हुंडा तसेच घरातील किरकोळ कारणावरून वाद घालून दमदाटी तसेच शिवीगाळ करून मानसिक आणि शारीरिक त्रास दिला.

## दोन लाख 34 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** महानगर गॅसच्या ऑफिस मधून बोलत असल्याचे सांगून लिंक पाठवून ती लिंक ओपन केली असता दोन लाख 34 हजार रुपये इतर बँक खात्यात वळते करून घेण्यात आले. फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात 13 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.प्रिन्स सिंग हे कळंबोली, रोडपाली येथे राहत असून 26 जून रोजी त्यांच्या मोबाईल क्रमांकावर महानगर गॅस ऑफिस मधून बोलत असल्याचे सांगण्यात आले. यावेळी महानगर गॅसच्या कनेक्शनची जोडणी करण्यासाठी लिंक पाठवण्यात आली त्या लिंकला ओपन होण्यासाठी लागणारे वेगवेगळ्या परमिशन त्यांच्याकडून घेऊन दोन जुलै रोजी त्यांच्या बँक खात्यातून दोन लाख 34 हजार रुपये रक्कम इतर बँक खात्यात वळती करून घेऊन सिंग यांची फसवणूक करण्यात आली.

# मनमिळाऊ स्वभावाची चारुशीला मिलिंद गावंड यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**उरण रायगड प्रतिनिधी रणिता ठाकूर :** खोपटे गावची लेक आणि पिरकोन येथील गावंड परिवारातील लक्ष्मण गावंड यांची ज्येष्ठ सून कै. चारुशीला मिलिंद गावंड यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ रोजी दुःखद निधन झाले. अवघ्या ३४ व्या वर्षी भरलेला संसार, कुटुंबीय, मित्रपरिवार आणि साडेचार वर्षांचा चिमुकला मुलगा धैर्य यांना कायमचे पोरके करून त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांच्या निधनाने केवळ गावंड आणि ठाकूर परिवारच नव्हे, तर खोपटे, पिरकोन आणि संपूर्ण उरण तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

चार बहिणींमध्ये दुसऱ्या क्रमांकाच्या असलेल्या चारुशीला या लहानपणापासूनच मनमिळाऊ, हसतमुख, स्पष्टवक्त्या आणि सर्वांना एकत्र ठेवणाऱ्या स्वभावाच्या होत्या. स्वतःच्या दुःखापेक्षा इतरांच्या आनंदाला महत्त्व देणे, प्रत्येकाची काळजी घेणे आणि कोणत्याही परिस्थितीत नात्यांमध्ये प्रेम व जिव्हाळा टिकवून ठेवणे, ही त्यांची खास ओळख होती.

लग्नानंतर अवघ्या काही वर्षांतच त्यांनी आपल्या प्रेमळ आणि जिव्हाळ्याच्या स्वभावाने सासरच्या प्रत्येक व्यक्तीचे मन जिंकले. सासू-सासरे यांच्यावर त्या आई-वडिलांप्रमाणे प्रेम करीत. विशेषतः त्यांचे आणि सासूचे नाते हे आई-मुलीप्रमाणेच होते. कुठेही जाताना त्या सासूंना सोबत घेऊन जात असत. त्यांच्यासाठी सासूमध्येच त्यांना आईचे रूप दिसत होते.

त्यांचे पती मिलिंद गावंड यांनीही प्रत्येक सुख-दुःखात




त्यांना खंबीर साथ दिली. त्यांच्या आवडीची जपणूक व्हावी म्हणून कोप्रोली येथे धैर्य कॉस्मेटोलॉजी सेंटर सुरू करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले. त्या व्यवसायातून चारुशीलाताईंनी अल्पावधीतच ग्राहकांचा विश्वास आणि प्रेम संपादन केले. त्यांच्या गोड बोलण्याने, नम्र स्वभावाने आणि सेवाभावी वृत्तीने अनेकांची मने जिंकली.

आज मात्र त्यांच्या अकाली जाण्याने त्यांचा संसारच नव्हे, तर अनेकांची मने उद्ध्वस्त झाली आहेत. आईच्या मायेची आस लावून बसलेला साडेचार वर्षांचा धैर्य, पत्नीच्या आठवणीत व्याकूळ झालेले पती मिलिंद, मुलीप्रमाणे जपणारी सासू, प्रेमळ सासरे, माहेर-सासरचे नातेवाईक आणि असंख्य मित्रपरिवार यांच्यासाठी हा धक्का असह्य आहे.४ एप्रिल १९९२ रोजी जन्मलेल्या चारुशीला मिलिंद गावंड यांनी आपल्या प्रेमळ, सेवाभावी आणि जिव्हाळ्याच्या स्वभावामुळे अनेकांच्या हृदयात कायमचे स्थान निर्माण केले. त्यांचे अकाली निधन ही केवळ एका कुटुंबाची हानी नसून समाजाने एक प्रेमळ, मनमिळाऊ आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व गमावले आहे.

त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

**॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥**

"माणसं शरीराने दूर जातात; पण त्यांच्या प्रेमाच्या, मायेच्या आणि आठवणींच्या पाऊलखुणा मात्र आयुष्यभर मनात जिवंत राहतात. कै. चारुशीला ताई, तुमची उणीव कधीच भरून निघणार नाही. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो आणि दुःख सहन करण्याची शक्ती संपूर्ण परिवाराला प्रदान करो."

दैनिक युवक आधार परिवारातर्फे कै चारुशीला मिलिंद गावंड यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## पनवेल तालुक्यातील पालक शिक्षक संघ स्थापन न करणाऱ्या खाजगी शाळांवर कारवाई करण्याचे जिल्हा शिक्षण विभागाचे आदेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व खाजगी शाळांनी पालक - शिक्षक संघाची स्थापण करण्या संदर्भात मार्गदर्शक तत्वे निश्चित केले आहे. तसेच सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच माध्यमिक खाजगी शाळांमधील पालक - शिक्षक संघाची स्थापणा केल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत सभासदांच्या नावांची यादी आणि कार्यकारी समिति सदस्यांची यादी शिक्षण विभागाकडे सादर करणे बंधनकारक असताना, याची माहिती शिक्षण विभाग, पनवेल पंचायत समिति आणि शिक्षण विभाग, जिल्हा परिषद रायगड यांच्याकडे उपलब्ध नाही असे निदर्शनास आले आहे, हे अतिशय गंभीर असून कायद्याची पायमल्ली आणि उल्लंघन करणारे आहे. म्हणून या सर्व खाजगी शाळांनी पालक - शिक्षक संघाची स्थापना करावी आणि ज्या शाळा पालक - शिक्षक संघाची स्थापन करणार नाहीत अशा शाळांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी जिल्हा शिक्षणाधीकारी, रायगड यांच्याकडे प्रहार संघटनेने केली होती. त्या निवेदनाची दखल घेत जिल्हा शिक्षणाधीकारी, रायगड यांनी गट शिक्षणाधीकारी, पनवेल यांना पत्र काढून कारवाई करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे डॉ. सुनील शिरीषकर, जिल्हा अध्यक्ष रायगड प्रहार संघटना यांनी दिली.

पनवेल मधील खाजगी शाळा या मार्गदर्शक तत्वांची अमलबजावणी करणार नाही आहे की नाही असा सवाल प्रहारने उपस्थित केला आहे. ज्या खाजगी शाळा नियमांचे उल्लंघन करत आहेत त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याबरोबर शाळेची मान्यता काढून घेणे, तसेच अन्य संलग्न मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांचे ना हरकत प्रमाणपत्र काढून घेणे आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमान्वये देण्यात आलेली शाळांची मान्यता रद्द करून त्यांच्यावर कारवाई करावी अशा प्रमुख मागण्या ही प्रहारच्या वतीने करण्यात आल्या, यावेळी सोबत प्रहार संघटनेचे पदाधिकारी डॉ. सुनील शिरीषकर, ऐड. मनोज टेकाडे, राज्य प्रवक्ते, ऐड. अजय तापकिर, संपर्क प्रमुख कोकण, अजय कदम, राहुल, तेलंग, पंकज मोहिते, अभिनव येलवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पनवेलजवळ अज्ञात पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला

### मयताच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अज्ञात पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मयताची ओळख अद्याप पटलेली नसून त्याच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी पनवेल तालुका पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे.पोलीस उपनिरीक्षक विष्णू ठोंगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू क्रमांक 43/2026 भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 194 अन्वये नोंद करण्यात आली आहे.



2 जुलै 2026 रोजी सकाळी सुमारे 11.10 वाजण्याच्या सुमारास रिसॉर्टच्या मागील डोंगराळ झाडीत हा मृतदेह आढळला. मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने ओळख पटविणे कठीण झाले आहे. शवविच्छेदनासाठी मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या वर्णनानुसार, मृत व्यक्ती अंदाजे 40 ते 45 वर्षे वयोगटातील पुरुष असून केस काळे आहेत. चेहरा पूर्णपणे विद्रूप झालेला असून छाती व चेहऱ्यावर किडे लागलेले आहेत. अंगावर राखाडी रंगाची हाफ पॅन्ट असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

या अज्ञात मृत व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास किंवा त्याची ओळख पटत असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संपर्कासाठी पोलीस उपनिरीक्षक विष्णू ठोंगे तसेच पनवेल तालुका पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे पोलिसांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## झाडावर प्रेम करणे म्हणजे आईवर प्रेम करण्यासारखेच आहे – साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी/ सागर घरत :** वृक्षावर प्रेम करणे म्हणजे आपल्या आईवर प्रेम करण्यासारखेच आहे.तरी ते प्रेम वृक्ष लावून करू या.असा विचार को. म. सा. प.विश्वस्त साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल. बी.पाटील यांनी उरण एस. टी.डेपो येथे वृक्षारोपण कार्यक्रमा प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डेपो व्यवस्थापक बेंद्रेसाहेब होते.

यावेळी जे एन पी ए चे माजी वित्त अधिकारी महादेव घरत आपल्या भाषणात म्हणाले की वृक्षारोपण ही समाजाने समाजासाठी करायची सेवा आहे.अशा सेवेसाठी बोलाविल्या बद्दल डेपो व्यवस्थापक यांचे आभार मानले. अध्यक्ष बेंद्रे यांनी आपल्या प्रास्ताविकात कर्मचाऱ्यांच्या उत्साही सहभागामुळे असे कार्यक्रम यशस्वी होत आहेत.यावेळी समाजसेविका अनुताई



पाटील,सायली पाटील,तानाजी भोईर,संजय पाटील आणि एस टी डेपो कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती.त्यानंतर डेपो परिसरात १०० झाडे लावण्याचा उपक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत प्रत्यक्षात सुरू केला.

## यवतमाळातील प्रभाग क्र.२७ च्या विकासकामावर दुर्लक्ष; नागरिकांमध्ये संताप

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे :** यवतमाळ येथील प्रेरणा नगरातील सराफ व केंद्रे यांच्या घरासमोरील नालीवरील रपटा दोन्ही बाजूंनी खचल्याने वाहतूक धोकादायक झाली असून, अनेक अपघात घडले आहेत. रस्ता १५ फूटाऐवजी केवळ ६ फूटांवर आल्याने मोठा अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे.

"वारंवार तक्रारी करूनही संबंधित नगरसेवक यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.विशेष म्हणजे, इतर प्रभागांत विकासकामांचा धडाका सुरू असताना प्रभाग क्र. २७ मध्ये एकाही रुपयाचे विकासकाम मंजूर झालेले नाही,ही अत्यंत खेदजनक बाब आहे.नालीवरील रपटा तातडीने दुरुस्त करून प्रभागातील विकासकामांना मंजुरी



द्यावी.अन्यथा भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषद प्रशासनाची राहील.

**– दिनेश हरणे**
**सामाजिक कार्यकर्ते**

# आम्ही कोकणकर कलामंचचा कोकण सोहळा सन्मान संपन्न

### कोकणातील ११ रत्नांना कोकण सन्मान देऊन केले सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** आम्ही कोकणकर कलामंचच्या " कोकण सोहळा "सन्मान सोहळ्यात रविवार दि.१२ जुलै रोजी दादर येथे छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर येथे

कोकणातील ११ रत्नांना कोकण सन्मान देऊन सन्मान केला.सातत्याने समाजाची प्रेरणा घेऊन आणि कोकण हेच ध्येय, कोकणातली मातीला देखील सोन्याचा भाव मिळावा आणि कस्तुरीचा सुगंध यावा अशा ध्येय उद्दिष्टांना घेऊन आज पर्यंत चालत असलेल्या "आम्ही कोकणकर कलामंचाचा" प्रवास म्हणजे प्रत्येक क्षेत्रामध्ये निस्वार्थीपणे समर्पित होणे. दर वर्षी समाजसेवा करताना प्रामुख्याने अनाथ वृद्धश्रमाला भेट देऊन, अनाथ मुलांना भेट देऊन त्यांच्यासोबत आनंद व्यक्त करून भोजन समारंभ आयोजन करणे. म्हणजे दुःखी जीवनातील क्षणभर सुखाची फुंकर घालणारे हे "आम्ही कोकणकर कलामंच", कार्य आणि छत्रपती शिवरायांचा वारसा चालवत असताना गड संवर्धन कार्यात देखील यांचा सर्वात मोठा हात आहे. आणि सातत्याने कलाकारांचं संगोपन कलाकारांना उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन त्यांची कला सादर करण्यासाठी दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन त्यामध्ये बहुरंगी नमन, नाटक, लघुपट आयोजन करून शंभर पेक्षा जास्त कलाकारांचा ताफा असलेला हा एकमेव कलामंच आहे. या कला मंचामध्ये पहिल्यांदा एकही







पुरुष न घेता केवळ स्त्रियांचे बहुरंगी नमन सादर करणारे एकमेव कलामंच देखील नाव रुपाला आले आहे. तर केवळ दोन वर्षांमध्ये अकरा उपक्रम राबवून आपलं नाव अतिशय सुवर्णक्षणांनी लिहिलं गेलं आणि या साठी संपूर्ण "आम्ही कोकणकर कलामंचाचे" संस्थापक, दिग्दर्शक श्री. कृष्णा येद्रे यांची अतिशय मेहनत घेऊन हे विश्व उभे केले. ते आज सर्वांना पाहायला मिळाले. म्हणून या कोकणरत्न सन्मान सोहळयामध्ये प्रमुख अतिथीने मोठ मोठ्या कलाकारांनी प्रामुख्याने उपस्थिती दिली यामध्ये महाराष्ट्राची हास्यजत्रा अभिनेत्री शिवाली परब, प्रसार माध्यमा बिनधास्त मुलगी गौरी पवार, उद्योजक श्री. अभिजीत निंबरे, शैक्षणिक क्षेत्र श्री. लोकेश राज्याध्यक्ष, वैद्यकीय क्षेत्र डॉक्टर श्री. नागराज तेंडुलकर, सांस्कृतिक क्षेत्र शाहीर श्री. तुषार पंदेरे, शिवभक्त कोकण लोकनाट्य नमन, सामाजिक क्षेत्र जल फाउंडेशन कोकण विभाग, सांस्कृतिक क्षेत्र श्रीदेवी भगवती पारंपारिक दशावतार नाट्य मंडळ, पत्रकारिता क्षेत्र श्री पत्रकार दीपक मांडवकर, गड संवर्धन क्षेत्र दुर्गवीर प्रतिष्ठान उद्योजग खातू मसाले, उद्योजग पितांबरी, ज्वेलर्स मालक श्री.अनंत फिलसे, कोकणचा साज संगमेश्वरी बाज उत्कृष्ट कलाकार अभितेने श्री.सचिन काळे व राजकीय नेतृत्व, समाजसेवक आणि सहयोगी संघटना या सर्वांनी प्रामुख्याने उपस्थित दिली. व यांचा देखील सन्मान करण्यात आला.

प्रामुख्याने दादरच्या छत्रपती शिवाजी नाट्य मंदिरात या सन्मान सोहळा संपन्न होताना "आम्ही कोकणकर कलामंचाचे" वर्षभरातील अकरा उपक्रमाची यशोगाथा प्रस्तावना सादर करण्यात आली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाच्या सुरुवातीला रंगमंचाच्या समोर रसिक प्रेक्षकाच्या मधून छत्रपती शिवराय बळीराजा, परशुराम, संत महात्म्यांची लेझीमने नाचवत दिंडी रंगमंचावर पोहचली हेच कार्यक्रमाचं सर्वात मोठा आकर्षण ठरले. त्याच पद्धतीने प्रत्येक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. आपले मनोगत व्यक्त करताना महाराष्ट्राची हास्यता अभिनेत्री शिवली परब यांनी बोलून दाखवलं की कोकण म्हणजे आपला प्राण आहे. कोकणाला जेवढे जपाल तेवढेच आपले अस्तित्व टिकेल असे देखील यांच्या माध्यमातून सांगण्यात आलं. त्यानंतर संस्थापक कृष्णा यद्रे यांनी आतापर्यंत केलेल्या कष्टाचे मोल म्हणून प्रत्येक मान्यवरांनी स्तुती सुमने अर्पण केली व सर्वत्र कौतुक होत आहे. आणि भविष्यात आम्ही सर्व तुमच्या पाठीशी आहोत असं देखील संबोधित करण्यात आले. या कलामंचाच्या प्रत्येक कलाकाराचा देखील सन्मान करण्यात आला. यानंतर आमचं कोकण या कोकण संस्कृतीला जपणारे एक नाटक सादर करण्यात आले हे देखील या कार्यक्रमाचे आकर्षण हरले. आणि या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.पत्रकार खेरटकर यांनी केलं.कार्यक्रमाला सप्तरंग भरले. यांच्या सूत्रसंचालनाने प्रत्येक रसिका प्रेक्षक मोहित होत होता. टाळयांचा प्रतिसाद देत होता. हा संपूर्ण कार्यक्रम अतिशय भव्य दिव्य झाला असून प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करून गेला. आणि भविष्यात असे कार्यक्रम राबवून आपल्या कोकणी माणसाला मानसन्मान मिळेल असे सर्वांना वाटले. व अशी अशा प्रत्येकाने व्यक्त केली. आणि कलाकार आणि मान्यवर यांच्या हस्ते सर्वांचे आभार मानून संस्थापक श्री. कृष्णा येद्रे सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न केला.

# एसआयआर सर्वेक्षणात नियमांची पायमल्ली?

**बीएलओ घरोघरी जाण्याऐवजी मतदारांनाच केंद्रावर वारंवार बोलावल्याचा निदर्शनास**

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत ग्रामीण प्रतिनिधी** : एसआयआर सर्वेक्षणाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियमानुसार बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) यांनी मतदारांच्या घरी जाऊन माहिती पडताळणी करणे अपेक्षित आहे. आवश्यक असल्यास बीएलओने मतदाराच्या घरी तीन वेळा भेट देण्याची तरतूद असल्याचे सांगितले जाते.

मात्र, अनेक ठिकाणी याच्या उलट चित्र दिसून येत असल्याची नागरिकांकडून तक्रार करण्यात येत आहे. बीएलओ स्वतः घरी भेट देण्याऐवजी मतदारांनाच तीन ते चार वेळा मतदान केंद्रावर किंवा ठराविक ठिकाणी येण्यास सांगत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि कामानिमित्त बाहेर जाणाऱ्या नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे सांगितले जात आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत शिळगाव येथील शाळा क्रमांक ८१ मध्ये तर असे निदर्शनास आले आहे की मतदार मतदान केंद्रावर गेले असता तिथं बी एल ओ च उपस्थित नसतात आणि काही ठराविक पक्षातील किंवा विभागातील काही लोकांकडे फॉर्म देऊन ते वाटण्यास सांगण्यात येतात जर ते फॉर्म वाटणाऱ्यांनी मतदारांपर्यंत पोहोचवले नाही आणि काही कारणास्तव त्या मतदाराला तो फॉर्म भरता आला नाही तर याची जबाबदारी शासन घेणार का?

शासनाने या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांकडून वस्तुस्थितीची चौकशी करावी तसेच एसआयआर सर्वेक्षण शासनाच्या नियमांनुसार आणि पारदर्शक पद्धतीने राबविण्याच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

यात सुधारणा झाली नाही तर दैनिक युवक आधारचे पत्रकार रमेश राऊत आणि राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ यांच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी साहेबांना पत्र देऊन हा सर्व कारभार त्यांच्या लक्षात आणून दिला जाईल.

# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणुकीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणुकीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश निवडणुकीचे स्वरूप विद्यार्थ्यांना कळावे, तसेच लोकशाही मूल्यांची रुजवण, शिस्त, जबाबदारी, नेतृत्व गुणांचा विकास आणि भविष्यातील कार्याचे नियोजन विद्यार्थ्यांमध्ये व्हावे, हा होता. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, लोकशाहीची प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया अनुभवता यावी, असा यामागचा मुख्य हेतू होता.




या उपक्रमाच्या अनुषंगाने शाळेचे मुख्याध्यापक निशांत म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना निवडणुकीच्या संदर्भात मार्गदर्शन केले, तर निवडणूक पार पाडण्यासाठी विद्यालयातील शिक्षक रमेश सोनवणे, संगीता तायडे, डॉ. रमेश काळे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांची भूमिका पार पाडली.

शाळेतील विद्यार्थी संसदेमध्ये वर्गप्रतिनिधींमधून निवडणूक पद्धतीने विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या संसदेत मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, क्रीडा मंत्री, शिस्त मंत्री आणि सांस्कृतिक मंत्री यांसारखी विविध पदे विद्यार्थ्यांकडे सोपवण्यात आली.

विद्यार्थ्यांना भारतीय निवडणूक प्रक्रियेची माहिती होण्यासाठी विद्यार्थी संसद निवडणुकीचे निश्चित वेळापत्रक तयार करण्यात आले होते. त्या वेळापत्रकानुसार आचारसंहिता, अर्ज भरणे प्रक्रिया, अर्ज पडताळणी, उमेदवारांना चिन्ह वाटप, प्रचार, त्यानंतर प्रत्यक्ष मतदान व निकाल या सर्व निवडणुकीच्या पायऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतः अनुभवल्या. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया, उमेदवारी, मतदान आणि प्रतिनिधी निवड या तांत्रिक बाबींचे व्यावहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त झाले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निवडणुकीबद्दल अनेक बाबी शालेय जीवनात लक्षात आल्या. लोकशाही मतदान पद्धत कशी असते, लोकशाही मूल्यांची रुजवण, शिस्त व जबाबदारी, नेतृत्व गुणांचा विकास आणि भविष्यातील कार्याचे नियोजन विद्यार्थ्यांना समजले. याप्रसंगी मुख्याध्यापक निशांत म्हस्के यांनी उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, शाळेमध्ये विद्यार्थी संसद आयोजित करणे हा विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्याचा आणि त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक लक्ष्मण कोलोड, नरेशसिंग राजपूत, भिकन आगारे, सुनील तांबे, कडूबा गीते, रमेश परदेशी, अंगद काळे, गणेश चव्हाण, भास्कर सागरे, अरविंद सोनवणे, अमोल ताटू, गजानन दौड, पंकज सावंत, संगीता काळे, नम्रता वडमारे, हर्षदा सानान्से, रमेश सपकाळ, शैलेश मोरे यांनी परिश्रम घेतले.

# SJFOI च्या महाराष्ट्र अध्यक्षपदी ओमप्रकाश शिंदे; तर सरचिटणीसपदी संजय जोशीं

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** SJFOI च्या महाराष्ट्र अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार ओम प्रकाश शिंदे, जालना तर संजय जोशीं, पुणे याची सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे. अहिल्यानगर येथे झालेल्या कार्यकारिणी बैठकीत राष्ट्रीय सचिव डॉ. जयपाल पाटील यांनी महाराष्ट्र कार्यकारिणीची नावे करताना महाराष्ट्राचे उपाध्यक्ष म्हणून ऍड. गोपाळ शेळके तर खजिनदार म्हणून डॉ जयपाल पाटील कायदेशीर सल्लागार म्हणून ऍड. ओंकार माने व ऍड. सुनील रावडे यांची ही नावे घोषित केली. अहिल्यानगर येथे झालेल्या सीनियर जर्नालिस्ट फेडरेशन ऑफ इंडिया महाराष्ट्र कार्यकारिणी सभेत डॉ जयपाल पाटील यांनी ही कार्यकारीणीबद्दल माहिती देताना सांगितले की राष्ट्रीय पातळीवर या नावावर संमती देण्यात आली असून राष्ट्रीय अध्यक्ष श्री संदीप दीक्षित आणि उपाध्यक्ष व महाराष्ट्राच्या निरीक्षक श्रीमती सुहासिनी प्रभूगावकर यांच्या आदेशाप्रमाणे ही कार्यकारिणी घोषित करण्यात येत आहे. तसेच फेडरेशनची कायदेशीर नोंदणी पुणे येथे सहकार निबंधक यांच्याकडे दाखल केली असून येत्या जुलै महिन्यात रीतसरपणे ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल. तसेच फेडरेशनचे महाराष्ट्र शाखेचे अधिवेशन दिनांक 26 नोव्हेंबर महिन्यात पुणे येथे घेण्यात येणार आहे त्याबद्दलही त्यांनी माहिती दिली. नव्याने नियुक्त करण्यात आलेले महाराष्ट्र राज्याचे फेडरेशनचे अध्यक्ष ओम प्रकाश शिंदे यांचा पत्रकारिता क्षेत्रात प्रदीर्घ असा अनुभव असून ते 35 वर्ष ते कार्य करीत आहेत महाराष्ट्र राज्यातील अनेक पत्रकार संघटना व पत्रकारांशी त्यांचा संबंध आहे. तर सरचिटणीस पदी नियुक्त करण्यात आलेले संजय जोशी यांचा पत्रकारिता आणि जनसंपर्क यासोबत वृत्तपत्र व्यवस्थापन, जाहिरात आणि वितरणाच्या क्षेत्रात मोठा 33 वर्षे असा प्रदीर्घकाळ प्रोफेशनल असा अनुभव आहे. राज्यातील अनेक महत्त्वाच्या व नामांकित वृत्तपत्रांमधून त्यांनी कार्य केलेले आहे राज्यातील प्रत्येक विभागात त्यांचे वृत्तपत्रांत व संपादक पत्रकारांशी स्नेह आहेत तसेच इतर राज्यातही त्यांचा जनसंपर्क आहे. त्यामुळे ज्येष्ठ पत्रकारांच्या प्रलंबित असलेल्या अनेक समस्या सोडविण्यासाठी फेडरेशनच्या माध्यमातून ते कसोशीने प्रयत्न करतील याबद्दल खात्री आहे. यावेळी राज्याच्या विविध विभागाची विभागाचे अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव यांची ही नावे घोषित करण्यात आली त्याप्रमाणे - पश्चिम महाराष्ट्र विभाग अध्यक्ष म्हणून भगवानराव परळीकर, कोल्हापूर जिल्हा आणि कोकण विभाग अध्यक्ष राजा मकोटे, उत्तर महाराष्ट्र यादवराव पावशे अध्यक्ष, मराठवाडा विभाग अध्यक्ष म्हणून मकरंद जहागीरदार यांची त रायगड अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार श्री प्रदीप पाटील उरण, सरचिटणीस ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत सहस्रबुद्धे महाड, उपाध्यक्ष सौ भारती शहा, खोपोली यांची नियुक्ती घोषित करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ संपादकांना सांगितले की आपली तू चाकी अथवा चार चाकी वाहने कितीही घाई असली तरी वरून परवाना नसलेल्यांच्या हातात आपली वाहने देऊ नयेत चुकून अपघात झाल्यास वाहन मालकावर गुन्हा दाखल करण्यात येऊन दंड आकारण्यात येतो याची काळजी घ्यावी. कार्यकारिणी बैठकीसाठी ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख, आयेशा शेख मुलानी, बालाजी अडियल, अभय कुमार यादव, सौ. भारती शहा हेही उपस्थित होते.

# पाच वर्षांपासून घरभाडे भत्ता प्रलंबित; शासकीय कर्मचारी व शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी

**जुलै ते सप्टेंबर २०२१ या कालावधीतील मुंबईचा ३% घरभाडे भत्ता अद्याप थकीत; शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी**

**दैनिक युवक आधार**

**मुंबई | प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्यातील शासकीय कर्मचारी आणि शिक्षकांना देय असलेला घरभाडे भत्ता (HRA) अद्याप पूर्णपणे अदा न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः जुलै २०२१ ते सप्टेंबर २०२१ या तीन महिन्यांच्या कालावधीतील मुंबई महानगर क्षेत्रासाठी लागू असलेला ३ टक्के वाढीव घरभाडे भत्ता गेल्या पाच वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांकडून करण्यात येत आहे.

महागाई सातत्याने वाढत असताना घरभाडे भत्ता हा कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थैर्याचा महत्त्वाचा घटक मानला जातो. मात्र, शासनाकडे वारंवार निवेदने, पत्रव्यवहार आणि पाठपुरावा करूनही या प्रलंबित भत्त्याबाबत कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याने कर्मचारी आणि शिक्षकांमध्ये असंतोष वाढत आहे.

कर्मचारी प्रतिनिधींच्या मते, संबंधित शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून जुलै २०२१ ते सप्टेंबर २०२१ या कालावधीतील थकीत ३ टक्के घरभाडे भत्ता तातडीने अदा करणे आवश्यक आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी या प्रश्नाकडे शासनाचे वारंवार लक्ष वेधले असले, तरी अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही.

राज्य शासनाने तसेच वित्त विभाग आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन प्रलंबित घरभाडे भत्त्याबाबत त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी शासकीय कर्मचारी, शिक्षक आणि विविध कर्मचारी संघटनांकडून करण्यात येत आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेली ही रक्कम लवकरात लवकर वितरित झाल्यास हजारो कर्मचाऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

# 'निर्भीड पत्रकारिता पुरस्कार २०२६' ने पत्रकार दत्ता खंदारे सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई:(प्रतिनिधी)** : समाजातील तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या निर्भीड पत्रकारांचा आणि समाजासाठी झटणाऱ्या निस्वार्थ समाजसेवकांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी 'आर्यारवी एंटरटेनमेंट'च्या वतीने आयोजित पहिला भव्य 'पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य आणि समाजसेवक पुरस्कार सोहळा' नुकताच मुंबईत अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला.यावेळी जनसामान्यांचा आवाज आणि हिंदुत्वाचा वारसा जपणाऱ्या पत्रकार श्री. दत्ता श्रावण खंदारे यांना पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा 'निर्भीड पत्रकारिता पुरस्कार २०२६' ने सन्मानित करण्यात आले.




दादर येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात झालेल्या भव्य पुरस्कार सोहळ्यात प्रसिद्ध कवी आणि साहित्यिक अरुण म्हात्रे यांच्या शुभहस्ते खंदारे यांना स्मृतिचिन्हआणि पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले.या सोहळ्याला साहित्य, पत्रकारिता, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यात जगप्रसिद्ध बोलका बाहुलाकार आणि जादूगार श्रीधर कीर, प्रा. विष्णुभाऊ बापट, साहित्याचार्य पंढरीनाथ तामोरे, ज्येष्ठ पत्रकार गुरुनाथ मधुसूदन तिरपणकर, डॉ. सुनील भार्गवराम शिर्के ,समाजसेवक वैभव कदम, कृष्णा काजरोळकर, प्रसिद्ध अभिनेते डॉ. गौरव जयवंत पाटील आणि अतुल तोडकर यांचा समावेश होता.आयोजक महेश्वर तेंटाबे यांनी उत्कृष्ट असा पुरस्कार सोहळा आयोजित केल्या बद्दल सर्वांनी त्यांचे कौतुक केले.

# जनता दरबार'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; प्रलंबित प्रश्नांचा पाढा, तातडीच्या कार्यवाहीचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण नगरपरिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'जनता दरबार' उपक्रमाला सोमवारी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील विविध प्रभागांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाणीपुरवठा, रस्ते, गटारे, स्वच्छता, आरोग्य, पथदिवे, अतिक्रमण, कचरा व्यवस्थापन, नालेसफाई तसेच इतर नागरी सुविधांशी संबंधित प्रलंबित प्रश्न थेट नगराध्यक्षा आणि संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडले.




उरण शहरातील अनेक समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित असून त्यांचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याची भावना यावेळी नागरिकांनी व्यक्त केली. काही भागांमध्ये अपुरा पाणीपुरवठा, खराब रस्ते, पावसाळ्यात निर्माण होणारा जलभराव, उघडी गटारे, अस्वच्छता, वाढते अतिक्रमण आणि कचऱ्याची समस्या याकडे नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. अनेक तक्रारी यापूर्वीही करण्यात आल्या होत्या, मात्र त्यावर अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याची खंतही उपस्थितांनी व्यक्त केली.'तुमची समस्या, आमचे प्राधान्य' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात नागरिकांना आपल्या समस्या थेट मांडण्याची संधी मिळाली. त्यामुळे विविध विभागांशी संबंधित शेकडो तक्रारींची नोंद करण्यात आली. काही प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांना जागेवरच सूचना देण्यात आल्या, तर उर्वरित प्रश्नांवर नियमानुसार आणि टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले. नगराध्यक्षा सौ. भावना घाणेकर यांनी नागरिकांच्या प्रत्येक तक्रारीची गांभीर्याने दखल घेत, शहरातील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी नगरपरिषद कटिबद्ध असल्याचे सांगितले. नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांचे बारकाईने परीक्षण करून प्राधान्यक्रमाने त्यांचे निराकरण करण्यात येईल. काही प्रश्न तात्काळ सोडविण्यात आले असून उर्वरित कामांसाठी संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी उपस्थित नागरिकांनी अशा प्रकारचे जनता दरबार नियमितपणे आयोजित करण्याची मागणी केली. नागरिक आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद झाल्यास अनेक प्रश्न वेगाने मार्गी लागू शकतात, असे मतही अनेकांनी व्यक्त केले. दरम्यान, जनता दरबारात मोठ्या प्रमाणावर आलेल्या तक्रारींमुळे उरण शहरातील मूलभूत नागरी सुविधांसंदर्भातील अनेक प्रश्न अजूनही प्रलंबित असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. त्यामुळे आता जनता दरबारात दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत आणि किती वेगाने होते, याकडे संपूर्ण उरणकरांचे लक्ष लागले आहे.

# अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय संयुक्त भेट

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने भारताच्या अन्न प्रक्रियाला बळकटी देण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेत, चेंबर फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ स्मॉल अँड मिडियम बिझनेसेस च्या शिष्टमंडळाने नवी दिल्ली येथे अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाचे सचिव अविनाश जोशी यांची भेट घेतली. शासकीय योजनांची उद्योगांपर्यंत प्रभावी "लास्ट माइल डिलिव्हरी " सुनिश्चित करण्यासाठी घनिष्ठ सहकार्याबाबत या बैठकीत चर्चा झाली.



डॉ. प्रबोध हळदे आणि महासचिव डॉ. उमेश कांबळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने अन्न प्रक्रिया, मूल्यवर्धन, पायाभूत सुविधा विकास आणि उद्योजकतेला चालना देणाऱ्या मंत्रालयाच्या सक्रिय उपक्रमांबद्दल मंत्रालयाचे अभिनंदन केले. शासकीय योजना पात्र उद्योजकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचाव्यात यासाठी उद्योग संघटना मंत्रालयाच्या प्रयत्नांना कशा प्रकारे पूरक ठरू शकतात, यावर बैठकीत भर देण्यात आला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीचा महामेळावा जालना येथे उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर मराठवाडा प्रतिनिधी:- रमेश सुरशे** : माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीचा भव्य महामेळावा आज जालना येथील पाठक मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमास जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. अर्जुन भाऊ खोतकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार श्री. अर्जुनराव खोतकर यांनी पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ असून समाजात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले,पत्रकारांना त्यांच्या कार्यादरम्यान येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव त्यांच्या पाठीशी राहू व आवश्यक ती सर्व मदत करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. महेशजी सारणीकर होते.यावेळी समितीचे कार्याध्यक्ष श्री. सखारामजी पंत कुलकर्णी तसेच समितीचे संघटक प्राचार्य श्री. जगन्नाथ रासवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महामेळाव्यात समितीच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच समितीसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सभासदांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. भाऊसाहेब घुगे, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख श्री. पंडितराव भुतेकर, शिवसेना शहरप्रमुख श्री. विष्णू पांचफुले, माळी महासंघ जालना जिल्हाध्यक्ष श्री. संतोष रासवे, आदी सह इतर मान्यवर ही मंचावर उपस्थित होते.

संपूर्ण महाराष्ट्रातील समितीच्या कार्याचा प्रचार प्रसार आणि पदाधिकारी जोडणी करणाऱ्या प्रत्येक पदाधिकाऱ्याचा समितीच्या




वतीने स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल आणि पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. यात उपस्थितांपैकी महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष सखाराम कुलकर्णी, मराठवाडा विभागीय अध्यक्ष राजु शिंदे, मराठवाडा विभागीय कार्याध्यक्ष ओमप्रकाश पत्रे, मराठवाडा विभागीय सचिव गणेश सवने, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष रमेश सुरशे, काशिनाथ भालेराव, मराठवाडा उपाध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्याध्यक्ष समाधान पाटील, विदर्भ विभागीय महिला संघटक सौ. ज्योत्स्ना करवाडे, पुणे जिल्हा अध्यक्ष विकास क्षत्रिय, मुंबई जिल्हा अध्यक्ष किशोर गुडेकर, नांदेड जिल्हा अध्यक्ष देविदास एंगडे, नाशिक ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष शैलेश मालपुरे, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष रमेश केदारे, बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष सुरेश धारे, जालना जिल्हा उपाध्यक्ष अशोक म्हस्के, जालना जिल्हा संपर्कप्रमुख निवृत्ती गायके,भंडारा जिल्हा उपाध्यक्ष अमृतलाल चरडे, यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष राजेश पांडे, लातूर जिल्हा सचिव मंगेश चिंचोलीकर, छ. संभाजीनगर जिल्हा समन्वयक डॉ. युवराज साळवे, पाथर्डी तालुका अध्यक्ष नवनाथ जिवडे, छ. संभाजीनगर तालुका का. सदस्य विलास कुलकर्णी, अर्धापूर तालुका संघटक गंगाधर कदम, मंठा तालुका का. सदस्य अमोल जोशी, महादेव सुरशे, पैठण तालुका अध्यक्ष, ऋषिकेश सुरशे, छ. संभाजीनगर जिल्हा प्रसिध्दीप्रमुख,अर्जुन ढेरे घनसावंगी तालुका अध्यक्ष

हनुमान अंभोरे, घनसावंगी तालुका कार्यकारणी सदस्य, करण धोंगडे वाशिम जिल्हा संघटक,गोपाल बोरकर रिसोड तालुका अध्यक्ष, गजानन पवार वाशिम जिल्हा सरचिटणीस, सारंग महाजन अमरावती विभागीय संघटक,सिद्धार्थ धंदरे बुलढाणा जिल्हा सचिव,गजानन पवार,विठ्ठल राऊत सेलू तालुका अध्यक्ष,महेश राऊत परभणी जिल्हा उपाध्यक्ष, तुकाराम नाटकर सेलू तालुका सह सचिव, शिवाजी पवार सेलू तालुका उपाध्यक्ष, जयप्रकाश राऊत, गणेश नवघरे, माऊली सरोदे, अशोक हाणवते, डॉ. ऋषिकेश जायभाये तालुका अध्यक्ष आरोग्य आघाडी, मंठा यांचा समावेश होता.

समितीच्या परंपरेनुसार समितीतील काही पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्याची दखल घेवून नियुक्त पदावरून पदोन्नती करून वरिष्ठ पदावर नियुया देण्यात आल्या. जसे की विकास क्षत्रिय यांना पुणे जिल्हा अध्यक्ष पदी, देविदास एंगडे यांना नांदेड जिल्हा अध्यक्ष पदी, किशोर गुडेकर यांना मुंबई जिल्हा अध्यक्ष पदी, अमोल जोशी यांना मंठा तालुका अध्यक्ष पदी, ज्ञानेश्वर निकाळजे यांना जाफ्राबाद तालुका अध्यक्ष पदी यापेक्षा इतरही काही पदोन्नतीने नियुक्त करून त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला. महामेळाव्याच्या माध्यमातून पत्रकार संरक्षण,माहिती अधिकार जनजागृती,संघटन बळकटीकरण आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष जालना जिल्ह्यातील पदाधिकारी यशस्वी रित्या पार पाडले.

मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष काशिनाथ भालेराव यांनी कार्यक्रमाचे सुंदर आणि वैविध्यपूर्ण सूत्रसंचलन यशस्वीरित्या सांभाळत संपूर्ण मेळावा चालता बोलता ठेवला. त्याबद्दल त्यांचेदेखील आभार मानण्यात आले. समितीचे जालना जिल्हा सचिव जगन्नाथ घोडे यांनी उपस्थितांची बैठक व्यवस्था आणि प्रसंगी भोजन व्यवस्था देखील स्वतः उभे राहून हाताळली त्यांचेही आभार मानण्यात आले. आदल्यादिवशी उपस्थित राहून मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष रमेश सुरशे, पैठण तालुका अध्यक्ष महादेव सुरशे, छ. संभाजीनगर प्रसिद्धीप्रमुख ऋषिकेश सुरशे यांनी झोकून देवून कष्ट घेतले त्यांचे तसेच उपस्थितांचे देखील समितीच्या मेळाव्यास हजर राहून समितीच्या कार्याची भूमिका घेतल्याबद्दल समितीतर्फे मराठवाडा विभागीय अध्यक्ष राजू शिंदे यांनी आभार व्यक्त केले.

# नवी मुंबई विमानतळावरून आंतरराष्ट्रीय उड्डाणांची मुहूर्तमेढ; अबू धाबीसाठी थेट सेवा

**एअर इंडिया एक्सप्रेसची आठवड्यातून तीन दिवस थेट सेवा**
**देशांतर्गत सेवा सुरू झाल्यानंतर अवघ्या २०० दिवसांत आंतरराष्ट्रीय उड्डाणांना प्रारंभ**
**आतापर्यंत २३ लाखांहून अधिक प्रवाशांना सेवा; ४६ देशांतर्गत शहरांशी जोडणी**

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी** : अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड (एएएचएल) संचलित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून (एनएमआयए) नियोजित आंतरराष्ट्रीय विमानसेवेला प्रारंभ झाला असून, एअर इंडिया एक्सप्रेस १५ जुलैपासून नवी मुंबई–अबू धाबी मार्गावर आठवड्यातून तीन दिवस थेट उड्डाण सेवा सुरू करणार आहे.

२५ डिसेंबर २०२५ रोजी देशांतर्गत सेवा सुरू झाल्यानंतर अवघ्या २०० दिवसांतच विमानतळाने आंतरराष्ट्रीय सेवेचा टप्पा गाठला आहे. या सेवेमुळे मुंबई महानगर प्रदेशातील प्रवाशांना संयुक्त अरब अमिरातीच्या राजधानी अबू धाबीसाठी थेट आणि अधिक सोयीस्कर हवाई संपर्क उपलब्ध होणार आहे. तसेच, अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जच्या अखत्यारीतील सर्व विमानतळ आता आंतरराष्ट्रीय सेवांशी जोडले गेले आहेत.

अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल म्हणाले की, "नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवासातील हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध यंत्रणा, नियामक संस्था तसेच सर्व भागधारकांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले. पहिल्या आंतरराष्ट्रीय मार्गासाठी एअर इंडिया एक्सप्रेसने दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे



आभारी आहोत. येत्या काळात अधिक विमान कंपन्या आणि नव्या आंतरराष्ट्रीय गंतव्यांचा समावेश करत जागतिक दर्जाचा प्रवास अनुभव देण्यावर आमचा भर राहील."

एअर इंडिया एक्सप्रेसचे अध्यक्ष निपुण अग्रवाल म्हणाले की, "नवी मुंबई विमानतळावरून अबू धाबीसाठी थेट सेवा सुरू करताना आम्हाला आनंद होत आहे. या मार्गामुळे मुंबई महानगर प्रदेशातील प्रवाशांना यूएईसाठी आणखी एक सोयीस्कर पर्याय उपलब्ध होईल. आमच्या दुहेरी विमानतळ धोरणात नवी मुंबई विमानतळाची महत्त्वाची भूमिका असून, या भागीदारीतून भविष्यात आणखी व्यापक हवाई संपर्क निर्माण करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत."

अवघ्या सात महिन्यांत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने ४६ देशांतर्गत शहरांशी हवाई संपर्क प्रस्थापित करत २३ लाखांहून अधिक प्रवाशांना सेवा दिली आहे. सध्या या विमानतळावर दररोज सुमारे १५० हवाई वाहतूक हालचाली होत आहेत.

पहिल्या आंतरराष्ट्रीय उड्डाणाद्वारे नाशवंत वस्तूंच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय निर्यात मालवाहतुकीलाही सुरुवात झाली आहे. त्यामुळे भारतीय निर्यातदारांना जागतिक बाजारपेठेत अधिक वेगाने पोहोचण्याची संधी उपलब्ध होणार असून, विमानतळाच्या मालवाहतूक क्षमतेलाही नवी दिशा मिळणार आहे.

अबू धाबी हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील पहिला आंतरराष्ट्रीय मार्ग असून, लवकरच आणखी अनेक आंतरराष्ट्रीय गंतव्ये या जाळ्यात समाविष्ट होणार आहेत. त्यामुळे मुंबईच्या वाढत्या हवाई वाहतूक क्षमतेला बळ मिळण्यासह भारताच्या आंतरराष्ट्रीय संपर्क, व्यापार आणि पर्यटनालाही चालना मिळणार आहे

# वादळी वाऱ्यामुळे सौर कृषी पंपाच्या पॅनेलचे नुकसान; ग्रामपंचायतीकडून पंचनामा

**दैनिक युवक आधार**

**हदगाव प्रतिनिधी विश्वदीप कांबळे** : तालुक्यातील डोरली येथे ४ मे २०२६ रोजी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे शेतकरी धनंजय कृष्णा मिटकरी यांच्या गट क्रमांक २२ मधील विहिरीजवळ बसविण्यात आलेल्या सौर कृषी पंपाच्या दोन सोलर पॅनेलच्या प्लेटांना तडे जाऊन नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली.

या घटनेनंतर ग्रामपंचायत डोरलीच्या वतीने घटनास्थळी जाऊन पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला. पंचनाम्यानुसार वादळी वाऱ्यामुळे सौर कृषी पंपाच्या दोन पॅनेलचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

पंचनाम्यावेळी सरपंच सौ. शांताबाई भगवानराव जारंडे ग्रामविकास अधिकारी श्रीमती एस. एस. काळे ग्रामपंचायत सदस्या सौ. रंजना शंकर सिरसाट तसेच इतर पंच व ग्रामस्थ उपस्थित होते.या नुकसानीची नोंद संबंधित यंत्रणेकडे करून शेतकऱ्यास शासनाच्या नियमानुसार मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# महाराष्ट्राचा प्रादेशिक भूगोल' पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात



**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील प्राध्यापक डॉ. पंकज शिंदे लिखित 'महाराष्ट्राचा प्रादेशिक भूगोल' या पुस्तकाचे प्रकाशन आज (दि. १४ जुलै २०२६) अजिंठा शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. प्रकाशदादा काळे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. हे डॉ. शिंदे यांचे सातवे पुस्तक असून शैक्षणिक क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण भर ठरणार आहे.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे, प्रो. डॉ.शिवाजी अंभोरे,डॉ. सी. यू. भोरे, कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी डॉ. पंकज शिंदे यांचे अभिनंदन करत त्यांच्या सातत्यपूर्ण लेखनकार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त, अभ्यासक्रमाभिमुख व संदर्भग्रंथ म्हणून हे पुस्तक निश्चितच मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमात उपस्थितांनी डॉ. शिंदे यांना पुढील लेखन व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. पुस्तक प्रकाशनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेलान आहे.

# नांदूर विठ्ठलाचे येथे १,००८ वाचकांचे सामूहिक ज्ञानेश्वरी पारायण

**१४ ते २१ ऑगस्टदरम्यान हरिनाम सप्ताह; भाविकांना सहभागाचे आवाहन**

**दैनिक युवक आधार**

**आष्टी : प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे** : आष्टी तालुक्यातील नांदूर विठ्ठलाचे येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी (कपारीचा विठोबा) मंदिरात यंदाच्या वार्षिक हरिनाम सप्ताहानिमित्त १,००८ वाचकांच्या सामूहिक ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १४ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत हा भक्तिमय उपक्रम पार पडणार आहे.

वारकरी संप्रदायातील श्रद्धा, भक्ती आणि ज्ञानाची परंपरा जपणारा हा आगळावेगळा उपक्रम असून, सात दिवस अखंड ज्ञानेश्वरी वाचनातून अध्यात्माची गंगा अविरत वाहणार आहे. परिसरासह राज्यभरातील वारकरी, ज्ञानेश्वरीप्रेमी आणि भाविकांनी या ऐतिहासिक पारायण सोहळ्यात सहभागी होऊन श्री विठ्ठलाच्या चरणी भक्ती अर्पण करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

पारायणात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी नावनोंदणी लवकरात लवकर करावी, असे आवाहन ह.भ.प. नामदेव शास्त्री विधाते महाराज यांनी केले आहे.

नावनोंदणीसाठी संपर्क

ह.भ.प. नामदेव शास्त्री विधाते महाराज – मो. ९९२२२४७५९६

ह.भ.प. सोमनाथ महाराज विधाते (श्रीक्षेत्र नांदूर विठ्ठलाचे) – मो. ८३८०८५०९३८

ह.भ.प. सखाराम महाराज विधाते (श्रीक्षेत्र नांदूर विठ्ठलाचे) – मो. ९३२२५६०५१३

ज्ञान, भक्ती आणि वारकरी परंपरेचा संगम घडविणारा हा सोहळा भाविकांसाठी एक अविस्मरणीय आध्यात्मिक पर्व ठरणार असल्याची भावना परिसरातील भक्तांकडून व्यक्त होत आहे.

# खडकी नदीवरील धरणात घातक रसायनांचा विळखा; हजारो मासे मृत

## डॉ. संतोष पाटील यांची हरित लवादाकडे तिसऱ्यांदा धाव; सिंडिकेटवर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर** : गत एक महिन्यांपासून राज्यभर गाजत असलेल्या जळगाव व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वन विभागाचे राखीव वन क्षेत्र, धरण, नदी आणि नाल्यांच्या लगत १२ हून अधिक घातक रसायने भरलेले ड्रम, जमिनीत सांडलेली रसायने, रसायने जाळून निर्माण होणारे प्रचंड वायू प्रदूषण आणि ३० ट्रकहून अधिक घातक रसायनांची संयुगे असलेली पावडर अशा निसर्ग व समाजविघातक बाबींमुळे निसर्गाची अपरिमित हानी झाल्याचे शासनास व समाजास निदर्शनास आले आहे.

दोन दिवसांपासून अजिंठा डोंगरास लागून असलेल्या खडकी नदीवरील धरणातील मासे या रसायनांमुळे मृत होऊन धरणाच्या चारही बाजूस पडल्याचे सिल्लोड येथील वन्यजीव संवर्धक डॉ. संतोष पाटील, भूषण कानडजे व तोंडापूर येथील नागरिकांना



**धोक्याची घंटा!**

मृत माशांचा खचः खडकी नदीवरील धरणाच्या चारही बाजूंना हजारो मासे मृत.
सिंडिकेटचा काळा कारभारः १२०० हून अधिक रसायने व ३० ट्रकपेक्षा जास्त घातक पावडरचा विळखा.
आरोग्याला धोकाः दूषित मासे खाल्ल्याने तोंडापूर येथील ३ ते ४ नागरिक आजारी.
कायदेशीर लढाः डॉ. संतोष पाटील यांची हरित लवादाकडे तिसऱ्यांदा तक्रार (जी.ओ. टॅगिंग पुराव्यांसह).
तातडीने सूत्रधारांवर कारवाई व्हावी, हीच जनमागणी!

आढळून आले. गत १५ दिवसांपूर्वी काही समाजकंटकांनी ही घातक रसायने डोंगरातून येणाऱ्या व वनक्षेत्राच्या अखत्यारीत येणाऱ्या खडकी नदीत ओतली होती, जी आजही येथील वाळूवर व जमिनीवर दिसत आहे. ही रसायने धरणाच्या आजूबाजूलाही आढळून आली असून, ती जप्त करून योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पुणे येथे नेण्यात येत आहे.

नुकत्याच झालेल्या पावसाने ही रसायने धरणात वाहत येऊन जलचरांना बाधा पोहोचली असावी, असे डॉ. पाटील यांनी सांगितले. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी व पर्यावरण, प्रदूषणाचा विचार होऊन संबंधित समाज व निसर्ग घातक व्यक्तींविरुद्ध बीएनएस (BNS) च्या प्रदूषण नियंत्रण कायद्याने कार्यवाही व्हावी, यासाठी राष्ट्रीय हरित लवादाकडे ईमेलद्वारे पत्र, संबंधित बातम्या व मृत माशांचे जी.ओ. टॅगिंग (Geo-tagging) फोटो पाठवून तक्रार केली आहे. हे मासे खाल्ल्याने तोंडापूर येथील ३ ते ४ नागरिक आजारी पडल्याची माहिती भूषण कानडजे यांनी दिली. या प्रकरणी दोन्ही जिल्ह्यांत आजवर ९ व्यक्तींविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले असून, या प्रकरणाची व्याप्ती मोठी असून हे सिंडिकेट स्वरूपाचे कृत्य आहे.

## सेतू केंद्रांवर सेवा शुल्काचे दरफलक लावण्याची मागणी



**दैनिक युवक आधार**

**माहूर (प्रतिनिधी)** : माहूर शहरातील सर्व सेतू सुविधा केंद्रांवर विविध प्रमाणपत्रांच्या सेवा शुल्काचे शासनाने निश्चित केलेले अधिकृत दरफलक दर्शनी भागात लावणे बंधनकारक करावे, अशी मागणी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, माहूर तालुका यांच्या वतीने तहसीलदारांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.निवेदनात म्हटले आहे की, सेतू सुविधा केंद्रांमध्ये उत्पन्न, जात, रहिवासी, नॉन-क्रीमी लेयर, ज्येष्ठ नागरिक, अधिवास आदी विविध प्रमाणपत्रांसाठी अर्ज स्वीकारले जातात. मात्र अनेक केंद्रांवर शासनाने निश्चित केलेल्या सेवा शुल्काचे दरफलक लावलेले नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून काही ठिकाणी अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.

नागरिकांना शासनमान्य सेवा शुल्काची स्पष्ट माहिती मिळावी, व्यवहारात पारदर्शकता यावी तसेच आर्थिक फसवणूक किंवा गैरसमज टाळण्यासाठी सर्व सेतू केंद्रांवर अधिकृत शुल्काचे दरफलक दर्शनी ठिकाणी लावण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच संबंधित अधिकाऱ्यांमार्फत वेळोवेळी तपासणी करून दरफलकाची अंमलबजावणी होत असल्याची खात्री करावी तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रांवर आवश्यक ती कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतील मोबाईल विक्री वाहनधारकांच्या प्रश्नावर युवासेनेची महापौरांशी सकारात्मक चर्चा

### कारवाईला तात्पुरती स्थगिती देण्याचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत व्यवसाय करणाऱ्या मोबाईल विक्री वाहनधारकांच्या गंभीर प्रश्नासंदर्भात आज पनवेल महानगरपालिकेचे सन्माननीय महापौर श्री. नितिनभाई पाटील यांची युवासेना कार्यकारणी सदस्य तथा लोकसभा संपर्कप्रमुख श्री. विश्वजीतजी बारणे यांच्या आदेशाने युवासेनेच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.



युवासेना लोकसभा अध्यक्ष श्री. पराग मोहिते यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत विधानसभा संपर्क अध्यक्ष अभिनय सोमण, विधानसभा अध्यक्ष जय कुष्टे, महानगर अध्यक्ष प्रेम ठाकूर, विधानसभा संघटक ओंकार वेदांत, शहर अध्यक्ष जयेश विसावे, ॲड. तुषार चौधरी, वृषभ गोंधळी, शहर सचिव विनीत पाटील, शहर समन्वयक दुर्गेश शुक्ला, शहर उपाध्यक्ष आदिल शेख, विभाग अध्यक्ष अक्षय पवार, आयुष ओंबळे, विभाग उपाध्यक्ष फरहाद शेख, सोशल मीडिया खांदा कॉलनी अध्यक्ष साई मोप्सुगू यांच्यासह अनेक युवासैनिक उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत शासनमान्य व्यवसाय करणाऱ्या ३७ पेक्षा अधिक लघु उद्योजक कुटुंबांवर निर्माण झालेल्या संकटाची सविस्तर माहिती महापौरांसमोर मांडण्यात आली. महापालिकेकडून योग्य नियोजनाअभावी शासनाच्या अधिकृत योजनेतील लाभार्थ्यांवर कारवाई होत असून त्यामुळे अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर गदा येत असल्याचे युवासेनेने निदर्शनास आणून दिले. तसेच या लाभार्थ्यांसाठी महापालिकेने अधिकृत व्यवसायासाठी योग्य जागा निश्चित करून कायमस्वरूपी धोरण तयार करण्याची मागणी करण्यात आली.सन्माननीय महापौर श्री. नितिनभाई पाटील यांनी या विषयावर अत्यंत सकारात्मक भूमिका घेत लाभार्थी उद्योजकांशी थेट संवाद साधला व काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. संबंधित प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि लाभार्थी यांच्यात समन्वयातून तोडगा काढण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

तसेच महापौर आणि आयुक्त यांच्यासोबत युवासेनेची संयुक्त चर्चा होऊन हा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघेपर्यंत मोबाईल विक्री वाहनधारकांवरील कारवाई थांबविण्याच्या सूचना करण्यात आल्या, त्यामुळे लघु उद्योजकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

युवासेनेने या प्रश्नाचा कायमस्वरूपी आणि न्याय्य तोडगा निघेपर्यंत शासन, महापालिका प्रशासन आणि लाभार्थी यांच्या समन्वयातून सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. शासनाच्या रोजगार निर्मितीच्या उद्देशाला बाधा न येता लघु उद्योजकांना सन्मानाने व्यवसाय करता यावा, यासाठी युवासेना कटिबद्ध असल्याचे लोकसभा अध्यक्ष श्री. पराग मोहिते यांनी यावेळी सांगितले.

## बालानगर येथे विशेष सखोल पुनरिक्षण अभियानाचा गटविकास अधिकाऱ्यांकडून आढावा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:-ऋषिकेश सुरशे (छत्रपती संभाजीनगर):-** निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रभर सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण अभियानांतर्गत बालानगर येथे मतदारांचे मॅपिंग, प्रगणना फॉर्म भरणे तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याचे काम सुरू असून या कामाचा आढावा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती मनोरमा गायकवाड यांनी घेतला.



यावेळी त्यांच्यासोबत सहाय्यक गटविकास अधिकारी श्री. राजेश कांबळे उपस्थित होते. त्यांनी बालानगर येथील नागरिकांशी संवाद साधून अभियानाची माहिती घेतली तसेच सुरू असलेल्या कामाची पाहणी केली.

यावेळी बोलताना गटविकास अधिकारी श्रीमती मनोरमा गायकवाड यांनी सांगितले की, "सर्व मतदारांनी आवश्यक कागदपत्रे व माहिती अचूक आणि योग्य स्वरूपात मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी. बालानगर गावातील नागरिक या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत असून त्याबद्दल समाधान वाटते."

सहाय्यक गटविकास अधिकारी श्री. राजेश कांबळे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, "मतदारांनी थोडा वेळ काढून ही प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. आज केलेली थोडीशी सुरुवात उद्याच्या मोठ्या अडचणींपासून वाचवू शकते."

या भेटीदरम्यान आर्शिया एजाज शेख या मतदाराचा प्रगणना फॉर्म भरून घेण्यात आला. तसेच बालानगर येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि बालानगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक उपस्थित होते.

## एकोडी / परस्टोला येथील वीज वितरण कार्यालयावर एकोडी ग्रामस्थांचा व शेतकऱ्यांचा एल्गार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा विशेष प्रतिनिधी-** वीज वितरण कार्यालय एकोडी / परसटोला येथे एकोडी व परिसरातील ग्रामस्थांनी कनिष्ठ अभियंता पंधरे साहेब तथा अधीक्षक अभियंता भंडारा इंजी. राजेंद्र गिरी यांना निवेदन देण्यात आले.अघोषित सुरू असलेली लोडशेडींग बाबत चर्चा करण्यात आली.

तसेच लोडशेडींग तात्काळ बंद करण्यात यावी. अन्यथा समस्यांची निराकरण न झाल्यासं भव्य दिव्य आंदोलन वीज वितरण कार्यालय एकोडी येथे करण्यांत येईल.निवेदन देतानी एकोडी येथील सरपंच संजयजी खोब्रागडे , सतीशजी समरीत अध्यक्ष सोसायटी, संजय समरीत सामाजिक कार्यकर्ते, खुशाल तरोने सर, एकनाथ कोटांगले संचालक, रिगन राऊत उपसरपंच, भावेश कोटांगले ग्रा. पं. सदस्य , वैभव खोब्रागडे ग्रा. पं. सदस्य, योगराज भुरे,मंगेश भुरे, बोपचे , हटवार, सचिन भुरे , हेमने उपस्थित होते.






## कळंबोली येथील आरोग्य केंद्रात ईसीजी आणि एक्स–रे मशीन तातडीने उपलब्ध करून द्याव्यात

### नगरसेविका बायजा बबन बारगजे यांची महापौरांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली आरोग्य केंद्रांमध्ये नागरिकांना तातडीची वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी तेथे ईसीजी मशीन तसेच फ्रॅक्चर निदानासाठी आवश्यक एक्स-रे मशीन उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका *बायजा बबन बारगजे* यांनी महापौरांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

दि. 14/07/2026 रोजी दिलेल्या निवेदनात *बायजा बबन बारगजे* यांनी म्हटले आहे की, सध्या आपल्या परिसरातील आरोग्य केंद्रात हृदयविकाराची तपासणी करण्यासाठी ईसीजी मशीन आणि फ्रॅक्चरचे निदान करण्यासाठी एक्स-रे मशीन उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांना उपचारासाठी दूरच्या रुग्णालयात जावे लागत आहे.



यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तातडीची सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

बायजा बबन बारगजे यांनी पुढे मागणी केली की, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य केंद्रात ईसीजी मशीन व फ्रॅक्चर निदानासाठी आवश्यक एक्स-रे मशीन लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावी.

महापौरांनी या मागणीची सकारात्मक दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करावी अशी अपेक्षा त्यांनी निवेदनात व्यक्त केली आहे.

## 200 लिटरच्या बॅरलमध्ये वारकऱ्यांची सुरक्षा ? सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 'तात्पुरत्या' उपाययोजनेवर संताप

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना सार्वजनिक बांधकाम विभाग,भिगवण यांच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भवानीनगर येथील इरिगेशन बंगल्याजवळील पुलावर संरक्षक कठडा उभारण्याऐवजी तब्बल २०० लिटरचे प्लास्टिक बॅरल ठेवून त्यामध्ये दगड-गोटे भरून सुरक्षा व्यवस्था केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. ही व्यवस्था पाहून नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, हा उपाय सुरक्षा व्यवस्थेची थट्टा असल्याची भावना व्यक्त होत आहे.



या पुलाच्या सुरक्षेबाबत गेल्या सहा महिन्यांपासून सातत्याने विविध माध्यमांतून बातम्या प्रसिद्ध होत आहेत. स्थानिक नागरिकांनीही अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधले.मात्र इतका कालावधी उलटूनही पुलावर कायमस्वरूपी संरक्षक कठडा उभारण्यास विभागाला यश आलेले नाही.

विशेष म्हणजे, पालखी सोहळ्यादरम्यान हजारो वारकरी याच पुलावरून पायी प्रवास करणार असल्याची माहिती संबंधित विभागाला असतानाही कोणतीही ठोस आणि टिकाऊ उपाययोजना करण्यात आलेली नाही. उलट केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठी बॅरल ठेवून सुरक्षा केल्याचा देखावा करण्यात आल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. वारकऱ्यांच्या जीविताशी संबंधित इतक्या गंभीर विषयाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष का केले? एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल भवानीनगर व सणसर परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत. वारकरी संप्रदायाच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र प्रत्यक्षात दिसणारी ही तात्पुरती आणि अपुरी व्यवस्था प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करत आहे. त्यामुळे या पुलावर तातडीने मजबूत व कायमस्वरूपी संरक्षक कठडा उभारून वारकऱ्यांच्या सुरक्षिततेची खात्री करावी,अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## वृद्ध महिलेची 10 लाख 57 हजारांची फसवणूक करणारा सराईत आरोपी पोलिसांच्या ताब्यात; इमामवाडा पोलिसात आणखी एक गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : घरातील ओळखीच्या व्यक्तीनेच विश्वासघात करून 77 वर्षीय वृद्ध महिलेच्या घरातील सोने आणि रोख रक्कम असा एकूण 10 लाख 57 हजार 500 रुपयांचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी इमामवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी यापूर्वीच दुसऱ्या फसवणुकीच्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती समोर आली आहे.

**काय आहे प्रकरण?**

तक्रारदार *पार्वतीबाई बकारामजी हनवते, वय 77 वर्षे, रा. प्लॉट नं. 87, राजबक्ष ले आऊट, मेडीकल चौक, नागपूर* यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल झाला आहे.

पार्वतीबाई यांच्या ओळखीचे आरोपी *कमलेश गणपत हनवते, रा. 18 सोमवारी पेठ, 183/4 ईपीएफ कार्यालयामागे, नागपूर* याने दि. 01/01/2023 ते 12/07/2026 या कालावधीत वेळोवेळी त्यांच्या घरातून ऐवज लंपास केला.

**लंपास झालेला ऐवज:**

1. अडीच तोळ्याच्या सोन्याच्या दोन बांगड्या - 75,000 रु.
2. साडेतीन तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र - 1,05,000 रु.
3. दोन तोळ्याचा सोन्याचा गोफ - 60,000 रु.
4. दोन तोळ्याचे दोन सोन्याचे कानातले - 60,000 रु.
5. एक-एक तोळ्याच्या चार सोन्याच्या अंगठ्या - 1,20,000 रु.
6. 9 ग्रॅम वजनाचे सोन्याचे शिक्के - 27,000 रु.
7. रोख रक्कम - 6,00,000 रु.

*एकूण मुद्देमाल: 10,57,500 रु.*

**आधीच सक्करदरा पोलिसांच्या ताब्यात**

पोलीस उप आयुक्त रश्मिता राव, परिमंडळ-4 यांच्या माहितीनुसार, आरोपी कमलेश हनवते याच्याविरुद्ध यापूर्वीच सक्करदरा पोलीस ठाण्यात दि. 04/07/2026 रोजी अप. क्र. 289/2026, कलम 308(5), 352, 3(5) BNS अंतर्गत गुन्हा दाखल आहे. तपासात त्याने शहरातील अनेक नागरिकांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले होते.

त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत पार्वतीबाई यांनी इमामवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

**इमामवाडा पोलिसात दुसरा गुन्हा**

उप आयुक्त रश्मिता राव आणि वपोनि जयवंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इमामवाडा पोलीस ठाण्यात अप. क्र. 247/2026, भारतीय न्याय संहिता `BNS` कलम 318(4) फसवणूक आणि कलम 351(3) धमकी देणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर तपास वपोनि जयवंत पाटील, सपोनि राजश्री चंदापुरे आणि पोउपनि नेहा कोंडेकर हे करत आहेत. आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

**पोलिसांचे आवाहन**

आरोपीने इतर कोणाची फसवणूक केली असल्यास संबंधितांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन इमामवाडा पोलिसांनी केले आहे.

## ग्रामविकास अधिकारी वैभव पाटलांवर फौजदारी दाखल करा, अन्यथा बीडीओंवर कारवाई!

### सीईओ नेहा भोसलेंचा खालापूर पंचायत समितीला दणका

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग: संतोष भगत** : खालापूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत केगांव येथील तत्कालीन ग्रामविकास अधिकारी वैभव बाळकृष्ण पाटील यांच्यावर शासकीय निधीचा अपहार आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दिले आहेत. यासोबतच, आदेश देऊनही त्यांना अद्याप कार्यमुक्त न केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत, त्यांना तात्काळ कार्यमुक्त करून सुधागड येथील नवघर ग्रामपंचायतीत हजर करण्याचे आणि त्यांच्यावर शिस्तभंगाची कडक कारवाई करण्याचे निर्देश खालापूरच्या गट विकास अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांनी केगांव ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असताना ग्रामनिधीतून वसूल केलेली रक्कम शासकीय तिजोरीत जमा न करता स्वतः परस्पर खर्च केली तसेच ग्रामपंचायतीच्या मूळ दस्तऐवजांमध्ये बनावट कागदपत्रांचा समावेश करून लाखो रुपयांचा अपहार केल्याचे विभागीय चौकशीत स्पष्ट झाले आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत १ जुलै २०२६ रोजी झालेल्या जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या सभेत संतप्त पडसाद उमटले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी गट विकास अधिकाऱ्यांना पाठवलेल्या आदेशात स्पष्ट बजावले आहे की, वैभव पाटील यांना तात्काळ कार्यमुक्त करून त्यांच्याविरुद्ध संबंधित पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि तसा अहवाल तात्काळ जिल्हा परिषद कार्यालयास सादर करावा. जर या आदेशाचे विहित मुदतीत पालन झाले नाही, तर गट विकास अधिकाऱ्यांवरही 'महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९' मधील नियम १० अन्वये शिस्तभंगविषयक कारवाई का करण्यात येऊ नये, असा सज्जड दमही या पत्राद्वारे देण्यात आला आहे.

# दारूबंदीसाठी महिलांचा एल्गार

## असंख्य महिलांच्या उपस्थितीत ग्रामसभा संपन्न



**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर (प्रतिनिधी) :** माहूर तालुक्यातील पवित्र गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मौजे शेख फरीद वझरा येथे बाबा शेख फरीद यांची पौराणिक पहाडात कोरलेली दर्गाह असून येथे पावसाळयात हिवाळयात आठ महिने धबधबा वाहत असल्याने लाखोच्या संख्येने सर्वधर्मीय भाविक पर्यटक येथे भेट देतात ,पेसा अंतर्गत असलेल्या गावात दारूच्या दुकानांना परवानगी दिल्याने गावातील नागरिकांचे मानसिक आर्थिक स्वास्थ बिघडल्याने महिलांनी एल्गार पुकारून दि 14 रोजी झालेल्या ग्रामसभेत 100% दारू दुकाने दारू बंद करण्याचा ठराव मंजूर केला

माहूर तालुक्यातील मौजे शेख फरीद वझरा या गावात 2 बियर बार व एक बिअर शॉपीच्या दुकानांना परवानगी देण्यात आली असून हातभट्टी दारू सह देशी दारू विकणाऱ्याचा सुळसुळाट झाल्याने गावात दररोज भांडणे मारामाऱ्या होत असल्याच्या तक्रारी वाढल्या असून नवरा बायकांच्या भांडणांना उग्र स्वरूप येत आहेत त्यामुळे गावातील महिलांनी गावच्या हितासाठी महिलांनी एल्गार पुकारत गावात दि 13 रोजी मिरवणूक काढून जनजागृती करत दि 14 रोजी ग्रामसभेत दारू बंद करणे यासाठी ठराव घेतला सदरील ग्रामसभा सरपंच दीपक केंद्रे यांचे सह मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडली.

दारूबंदीसाठी पुढाकार घेतलेल्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या या ग्रामसभेत सरपंच दीपक केंद्रे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष डिगाबंर केंद्रे , माहुर पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक बाबू जाधव, पो .का. ज्ञानेश्वर खंदाडे, ग्राम महसूल अधिकारी तवर ,ग्रामसेवक कराड, पेसा कर्मचारी ससाने, आरोग्यसेविका श्रीमती पुरी, अंगणवाडी सेविका नागरगोजे ताई, मुख्याध्यापक तेलंगे सर, फड सर, नागरगोजे सर यांचे सह सर्व गावकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पिंपळा–हनवतखेडा बससेवा अखेर सुरू; शिक्षकांच्या पाठपुराव्याने विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा !

## पिंपळा–हनवतखेडा टप्पा अनेक दिवसांपासून बंद, अखेर एसटी प्रशासनाने घेतली दखल

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : पिंपळा मालेगाव–बोरगाव–पिंपळा–आमखेडा या मार्गावरील एसटी बससेवा नियमितपणे सुरू होती. मात्र, या बसचा पिंपळा–हनवतखेडा हा पुढील टप्पा गावात बस वळविण्यासाठी जागा नसल्याच्या कारणास्तव अनेक दिवसांपासून बंद करण्यात आला होता. त्यामुळे हनवतखेडा येथील विद्यार्थिनींना पिंपळा येथील श्री पांडुरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षणासाठी ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेक विद्यार्थिनींना दररोज पायदळ शाळेत यावे लागत असल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते.

विद्यार्थिनींची ही गैरसोय लक्षात घेऊन श्री.पांडुरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळा येथील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मालेगाव एसटी डेपोच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधत प्रत्यक्ष परिस्थिती त्यांच्यासमोर मांडली. विद्यार्थिनींच्या हिताचा विचार करून पिंपळा–हनवतखेडा मार्गावरील बससेवा तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली. मालेगाव डेपोनेही या मागणीची दखल घेत वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविला.




'बस बंद असल्यामुळे विद्यार्थिनींना मोठा त्रास सहन करावा लागत होता. प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून वस्तुस्थिती मांडली. अखेर बससेवा पुन्हा सुरू झाल्याने विद्यार्थिनींच्या शिक्षणातील अडथळा दूर झाला, याचे समाधान वाटते.'

— एस. बी. देशमुख, शिक्षक,
श्री.पांडुरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळा

'गावातील विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी ही बस अत्यंत आवश्यक होती. एसटी प्रशासनाने आमच्या मागणीची दखल घेऊन पिंपळा–हनवतखेडा बससेवा पुन्हा सुरू केल्याबद्दल ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. यामुळे विद्यार्थिनींची मोठी गैरसोय दूर झाली आहे.'

— सरपंच, ग्रामपंचायत हनवतखेडा

त्यानंतर अकोला विभागाचे वाहतूक निरीक्षक प्रकाश साखरकर यांनी स्वतः हनवतखेडा येथे भेट देऊन बस प्रत्यक्ष गावात नेऊन रस्ता, वळणाची जागा व वाहतुकीची परिस्थिती तपासली. पाहणीदरम्यान बस वळविण्यास कोणतीही अडचण नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांनी तत्काळ बससेवा सुरू करण्याचे निर्देश दिले.त्यामुळे अनेक दिवसांपासून बंद असलेली पिंपळा–हनवतखेडा बससेवा सोमवारपासून पुन्हा सुरू झाली. या निर्णयामुळे विद्यार्थिनी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा मार्ग पुन्हा एकदा सुरळीत झाला आहे.यावेळी शाळेचे शिक्षक एस. बी. देशमुख, सेवक पुरुषोत्तम जोगदंड, मालेगाव डेपोचे चव्हाण साहेब, अकोला विभागाचे वाहतूक निरीक्षक प्रकाश साखरकर, हनवतखेडा येथील सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी श्री पांडुरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळा येथील मुख्याध्यापक आदरणीय देशमुख सर यांनी एसटी प्रशासन, अकोला विभागाचे अधिकारी, मालेगाव डेपो प्रशासन तसेच या कामासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

विद्यार्थिनींच्या हितासाठी प्रशासनाने घेतलेल्या सकारात्मक निर्णयाचे त्यांनी स्वागत केले.

'विद्यार्थिनींची गैरसोय लक्षात घेऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. बस वळविण्यास कोणतीही अडचण नसल्याचे आढळल्यानंतर पिंपळा–हनवतखेडा मार्गावरील बससेवा तात्काळ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या हितासाठी एसटी प्रशासन सदैव सकारात्मक भूमिका घेईल.'

— प्रकाश साखरकर, वाहतूक निरीक्षक, अकोला विभाग

# मूक बधिरांच्या नवीन शैक्षणिक वर्षाचा "शाळा प्रवेशोत्सव"

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर** : शंकर नगर नागपूर स्थित स्वर्गीय श्री. गो.म. खोडे मूक आणि बधिर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठींचा "शाळा प्रवेशोत्सव" हा विशेष उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या, सौ.द्रौपदी चव्हाण यांच्या मार्गदर्शनात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. विशेष म्हणजे निवृत्तीनंतर रिक्त पदावर नुकत्याच रुजू झालेल्या प्राचार्या, सौ. द्रौपदी चव्हाण यांच्या कारकीर्दीचा हा पहिलाच उपक्रम.




महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव करत लेझीम तसेच ढोल ताशाच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. सर्व मुलांचे औक्षवंत करून त्यांना वह्या पुस्तकासह वस्तू वाटप करून खाऊचे सुद्धा वितरण करण्यात आले. मुलांनी ढोल ताशाच्या तालावर नृत्य करून आपला आनंद व्यक्त केला. तदनंतर संस्थेच्या प्राचार्या, श्रीमती द्रौपदी चव्हाण यांनी स्वागत्तोपर भाषणात मुलांना विशेष मार्गदर्शन केले. तसेच दहावी आणि बारावी करून नुकतेच संस्थेतून पास आऊट झालेल्या विद्यार्थ्यांसाठी लवकरच संस्था कौशल्य विकास (Skill Development Course) या मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असून याचा लाभ घेण्यास विद्यार्थ्यांनी लवकरच संस्थेचे सचिव किंवा प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. उपस्थित असलेल्या पालकांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करत विद्यालया बाबत आपली कृतज्ञता व्यक्त केली. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात मूकबधिरांनी हा दिवस आनंदात घालविला.

# रामापूर धारूर येथील आरो प्लांट ची जागा बदलण्याची मागणी !!


## अकोट गटविकास अधिकाऱ्यांना ग्रामस्थांचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी:**अकोट तालुक्यातील गट ग्रामपंचायत रामापूर-धारूळ येथे नवीन पाणी फिल्टर आरो प्लांटचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. मात्र, हे बांधकाम ज्या पाण्याच्या टाकीखाली केले जात आहे, ती जुनी पाण्याची टाकी अत्यंत जीर्ण झाली आहे. ही टाकी कधीही कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची भीती निर्माण झाल्याने, या प्लांटची जागा बदलण्यात यावी, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या संदर्भात अकोटचे गटविकास अधिकारी आणि अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

**कामाचा विरोध नाही, सुरक्षेचा प्रश्न :**

ग्रामस्थांनी निवेदनात स्पष्ट केले आहे की, गावात शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी सुरू असलेल्या आरो प्लांटच्या कामाला कोणाचाही विरोध नाही. मात्र, ज्या जीर्ण पाण्याच्या टाकीखाली हे



बांधकाम सुरू आहे, ती जागा अत्यंत धोक्याची आहे. भविष्यात ही टाकी कोसळल्यास तिथे नागरिकांच्या जीवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. या जीर्ण टाकीबाबत संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना यापूर्वीही लेखी तक्रारी देण्यात आल्या आहेत.

**४० हून अधिक ग्रामस्थांच्या सह्यांचे निवेदन:**

सुरू असलेल्या आरो प्लांटच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामस्थांच्या मागणीचा सकारात्मक विचार करावा आणि ही जागा त्वरित बदलावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर गावातील सुमारे ४० महिला व पुरुष ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत . या निवेदनाच्या प्रती वरिष्ठ पातळीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. आता यावर वरिष्ठ अधिकारी काय निर्णय घेतात आणि जागेची पाहणी करून काय आदेश देतात, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

'त्या जीर्ण झालेल्या पाण्याच्या टाकीखाली नवीन आरो फिल्टर प्लांटचे काम केल्यास भविष्यात मोठी जीवितहानी होऊ शकते. वरिष्ठांनी या गंभीर बाबीची त्वरित दखल घेऊन जागा बदलावी.'

— जगदेव मोहिते रामापूर

'रामापूर येथील जुनी पाण्याची टाकी पूर्णपणे जीर्ण झाली आहे. त्याच टाकीच्या अगदी खाली नवीन आरो प्लांटचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. प्रशासनाने तात्काळ याची पाहणी करून या प्लांटची जागा बदलावी, हीच आमची मागणी आहे.'

— बापुराव रामलाल जाधव रामापूर

# कोनड मार्गे चिखली डेपोचा दोन बस फेऱ्या सुरू

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुंडलिक निकाळजे** : विदर्भ मराठवाडा जिव्हाळयाचा प्रश्न खऱ्या अर्थाने आज मार्गी लागला बस सुरू करण्यामागे विशेष सहकार्याने मा आमदार श्री संतोष पाटील दानवे, तथा आमदार मा सौ. श्वेताताई माहले पाटील व आमचे मार्गदर्शक चेअरमन मा श्री विजयसिंह नाना परिहार सततच्या पाठपुरावामुळे चिखली डेपो मॅनेजर श्री जोगदंड साहेब, एसटी कर्मचारी प्रताप वानखेडे यांच्या विशेष सहकार्याने बस सेवा सुरू करण्यात आली सकाळी 8 वाजता बस लालपरीचे मोठ्या उत्साहाने स्वागत करण्यात आले सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून बस सुरू करण्यात आली यावेळी उपस्थिती श्री विजयसिंह नाना परिहार चेअरमन श्री रामेश्वर सहकारी साखर कारखाना, कोनडगावाचे सरपंच श्री अशोक पवार ,उपसरपंच श्री संजय परिहार,श्री बिदेसिग परिहार,श्री ईश्वर परिहार, श्री नारायण माहले साहेब, श्री भिमराव परिहार, शेषराव परिहार शेषराव तुपे श्री शांम आण्णा परिहार नारायण शेळके, गणेश आण्णा परिहार भिमराव



परिहार,कैलास परिहार,छगन जोहरे , रामसिंग परिहार, काशिनाथ गाडेकर, प्रकाश महाराज,कोडूबा आप्पा देवमाने , रामसिंग महाराज,आसाराम खेडेकर सिताराम वाघ साहेब, अशोक धुधाळे, दिनकर आप्पा, विजय काकडे, मधूकर परिहार राजू परिहार, पंढरी परिहार रामेश्वर दांडगे गजानन बावने गणेश परिहार विशेष म्हणजे ज्येष्ठ प्रवाशांनी नाना यांचं शाल पुष्पहार देऊन गाडी चालू केल्याबद्दल स्वागत सत्कार केला यावेळी मोठ्या संख्येने गावकरी मंडळी उपस्थित होते

लालपरी बस सर्वसामान्यांची बस बस विशेष महत्त्व म्हणजे मराठवाडा विदर्भ यांच्यात असलेले जिव्हाळयाचे नातं म्हणजे विदर्भाची असलेला सोयरे नाते संबंध असल्यामुळे विशेष महत्त्व आहे म्हणजे शालेय विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे वयोवृद्ध दवाखान्याच्या कामासाठी तथा चिखली येथे भुसार मार्केट व मोठी बाजारपेठ उपलब्ध असल्यामुळे विशेष नाते सोयरेसंबंध जिव्हाळयाची लाळ जोडलेली असल्यामुळे विशेष महत्त्व आहे मधल्या मार्गे गाड्या नसल्याने सामान्य प्रवाशांचे हाल होत होते म्हणून सर्व प्रवाशांचे हित लक्षात घेऊन आदरणीय आमचे मार्गदर्शक विजय नाना परिहार यांनी सततचा पाठपुरावा करून चिखली डेपोच्या आज दोन बस फेऱ्या सुरू केल्या बद्दल खूप खूप धन्यवाद नाना व मागेही नानांनी जाफराबाद डेपोच्या दोन बस फेऱ्या सलग एक वर्ष पूर्ण झाले तरी सतत आजही चालू आहे

बस वेळापत्रक चिखली येथून सकाळी 7 वा निघेल कोनड मार्गे जाफराबाद येथे 8 30 वाजता येथून निघेल चिखलीला 10 वाजता पोहोचेल दुसरी फेरी दुपारी 1.30 मी चिखली येथून निघेल जाफराबाद ला 3 वाजता पोहोचेल तीन वाजता तिथून निघेल प्रवासामध्ये येणारे गाव जाफराबाद पिंपळखुटा देऊळगाव देवी फाटा कुंभारी फाटा सिपोरा फाटा खासगाव फाटा गोपी फाटा सोनगिरी फाटा वरुड कोनड मार्गे कोनड खुर्द देऊळगाव घुबे मलगी बेराळा भानखेडा मेकर फाटा चिखली जाफराबाद डेपो च्या दोन फेऱ्यांचे वेळापत्रक सायंकाळी 10वा जाफराबाद येथून निघेल चिखलीला 12 वाजता जाफराबाद कोनड मार्गे येथून निघेल सायंकाळी 5 वाजता निघेल चिखली ला 6 30 वाजता निघेल कोनड मार्गे

हे एवढे गाव प्रवासात येथील सर्व एसटी प्रवाशांनी सहकार्य करावे व एसटीचा आवश्यक लाभ घ्यावा सगळयांनी सहकार्याची भूमिका घ्यावी.

# गिरीस्थानांवरील शासकीय जमिनींसंदर्भातील प्रकरणांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय

## मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार महसूल विभागाच्या नवीन मार्गदर्शक सूचना; पर्यावरणीय निकषांचे पालन करूनच होणार निर्णय

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी अमरावती** : राज्यातील महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान, चिखलदरा, लोणावळा, खंडाळा, तोरणमाळ, इगतपुरी आदी गिरीस्थानांवरील शासकीय जमिनींसंदर्भातील विविध प्रकरणांबाबत राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल विभागाने यासंदर्भातील सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, यामुळे भविष्यातील निर्णय प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, एकसमान कार्यपद्धती आणि पर्यावरणीय निकषांचे काटेकोर पालन सुनिश्चित होणार आहे.

नवीन निर्देशांनुसार, गिरीस्थानांवरील भोगवटादार वर्ग-२ ते वर्ग-१ रूपांतरण, शर्तभंग प्रकरणे नियमानुकूल करणे तसेच भाडेपट्टा नूतनीकरण यासंबंधीची सर्व प्रकरणे अधिमूल्याची रक्कम कितीही असली तरी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी सखोल तपासणी करून शासनाच्या पूर्वमान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

यापूर्वी काही प्रकरणांमध्ये स्थानिक स्तरावर निर्णय घेतले जात असत. मात्र, आता सर्व प्रकरणांमध्ये शासनाची पूर्वमान्यता आवश्यक करण्यात आल्याने निर्णय प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येणार असून, नियमांचे काटेकोर





पालन सुनिश्चित होईल. तसेच, संबंधित प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेताना पर्यावरण व वन विभागाच्या नियमांचा आणि संवेदनशील पर्यावरणीय बाबींचा सखोल विचार करण्यात येणार असल्याचे मार्गदर्शक सूचनांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.गिरीस्थानांमधील शासकीय जमिनींच्या वापराबाबत अनेक वर्षांपासून विविध प्रकारची प्रकरणे प्रलंबित आहेत. नवीन मार्गदर्शक सूचनांमुळे अशा प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी एकसमान निकष लागू होतील आणि भविष्यातील निर्णय अधिक पारदर्शक, कायदेशीर व पर्यावरणपूरक पद्धतीने घेणे शक्य होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# मुदगल परिसरात वन्यप्राण्याकडून कोवळया पिकांची नासाडी

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी/ मुदगल परिसरात खरिपाच्या कोवळया पिकांची रोही हरिण यांचे कळप नासाडी करीत असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत वन विभागाने या कळपाचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे मुदगल या परिसरात जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शेतकऱ्यांनी पेरणी आटोपली त्यांनतर पावसाच्या शिडकाव्यामुळे पिकांची चांगली उगवण झाली तर काही ठिकाणी शेतकरी वखरनी कोळपणीचे कामे करत आहेत मात्र गेल्या काही दिवसांपासून शेतशिवारात वन्यजीवांचा उपद्रव वाढला आहे रोही हरिण यांचे मोठं मोठीं कळप शेतात कोवळया पिकांची नासाडी करीत असल्याने शेतकऱ्यांचे खुप मोठे नुकसान होत आहे अनेक शेतकरी रात्रंदिवस शेतशिवारात पिकांचे राखण करीत असून या वन्यजीवांच्या कळपाना हुसकावून



लावत आहेत मुदगल शिवारात सोयाबीन कापूस तूर मूग हळद या पिकांचा पेरा मोठ्या प्रमाणात झाला आहे हेच मुख्य पीक असल्याने यांच पीकामध्ये हे कळप घुसून पिकांचे मोठे नुकसान करत आहेत तर एकीकडे पावसाची उघडीप या मध्ये पिके वाळून जात आहेत आणि उरली सुरली ते ही पिके वन्यप्राणी नासाडी करीत आहेत तर या वन्यजीवांचा बंदोबस्त वन विभागाने तातडीने करावा अशी मागणी शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे

# कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे खेळणा नदीपात्रात अडथळा; शेतकऱ्याची शेतजमीन धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील पालोद येथील खेळणा नदीपात्रात 'पूल वजा केटीवेअर'चे काम पूर्ण झाले आहे. मात्र, कंत्राटदाराने बांधकामादरम्यान तात्पुरत्या वाहतुकीसाठी टाकलेला मातीचा भराव काम संपल्यानंतरही न हटवल्याने स्थानिक शेतकरी अक्षय कृष्णा समिंद्रे यांच्या शेतजमीनीसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. नदीपात्रातील या अडथळयामुळे पावसाळ्यात पाण्याचा नैसर्गिक प्रवाह रोखला जाऊन त्यांची शेतजमीन वाहून जाण्याची आणि उभे पीक नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे.

या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अक्षय समिंद्रे यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे. या निवेदनात



त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, कंत्राटदाराच्या या तांत्रिक त्रुटीमुळे पावसाळ्यात जमिनीचे नुकसान झाल्यास किंवा पीक वाया गेल्यास, त्याची संपूर्ण कायदेशीर व आर्थिक जबाबदारी ही संबंधित कंत्राटदार आणि त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेचीच राहील.

आपल्या शेतजमिनीचे नुकसान टाळण्यासाठी कंत्राटदाराने तात्काळ नदीपात्रातील मातीचा भराव उचलून नदीपात्र पूर्ववत करावे, अशी रास्त मागणी अक्षय समिंद्रे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# भीमनगर–चंद्रपूर रेल्वेमार्गावरील ROB उभारणीच्या मागणीवर आमदारांनी संयुक्त प्रशासकीय पथकासह केली पाहणी

## दोन दिवसांत सर्वेक्षण अहवाल सादर करण्याचे आदेश

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : नागपूर–रायपूर रेल्वेमार्ग आणि गोंदिया–चंद्रपूर रेल्वेमार्ग यांच्या दरम्यान वसलेल्या आंबेडकर वॉर्ड, सिंगलटोली, भीमनगर, कुंभारे नगर आणि चंद्रशेखर वॉर्ड येथील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून भीमनगर रेल्वे क्रॉसिंग बंद करून तेथे रेल्वेकडून उभारण्यात येणाऱ्या भूमिगत अंडरपासला विरोध करत असून, त्या ठिकाणी रेल्वे ओव्हरब्रिज (ROB) उभारण्याची मागणी करीत आहेत. या मागणीसाठी नागरिकांनी मोर्चा काढला, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले असून घटनास्थळी बेमुदत उपोषणही सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आज गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांनी जिल्हा प्रशासन व रेल्वे अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.



यावेळी आमदार विनोद अग्रवाल यांच्यासोबत नगराध्यक्ष सचिन शेंडे, नगरसेवक सुनील भालेराव, आंदोलनाचे नेतृत्व करणारे सामाजिक कार्यकर्ते अमित भालेराव, नगरसेवक पंकज यादव, सुनील भरणे, स्नेहा गडपायले, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, तहसीलदार पठाण, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बोरकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, रेल्वेचे वरिष्ठ विभागीय अभियंता मल्लिकार्जुनराव तसेच जिल्हा प्रशासन व रेल्वे विभागातील इतर अधिकारी उपस्थित होते.स्थानिक नागरिक, नगरसेवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सांगितले की, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे प्रशासन जनतेच्या सोयी-सुविधांचा कोणताही विचार न करता मनमानी पद्धतीने काम करीत आहे. अंडरपासचे बांधकाम सुरू करून येथील नागरिकांवर अन्याय केला जात आहे. हा परिसर नागपूर–रायपूर आणि गोंदिया–चंद्रपूर या दोन रेल्वेमार्गांच्या मधोमध वसलेला असून येथे मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. परिसरात शाळा, महाविद्यालये तसेच लघुउद्योग आहेत.

त्यांनी पुढे सांगितले की, यापूर्वी नागपूर–रायपूर रेल्वेमार्गावरील रेल्वे क्रॉसिंग बंद करून कमी उंचीचा अंडरपास देण्यात आला असून त्यामुळे मोठ्या वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे. शालेय बस, आपत्कालीन रुग्णवाहिका, घरबांधणीसाठी लागणारे ट्रक, जेसीबी, बोअरवेल यंत्रणा, वीज विभागाची वाहने आदींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांची ये-जा सध्या केवळ भीमनगर रेल्वे क्रॉसिंगवरूनच होत आहे. अशा परिस्थितीत आता चंद्रपूर रेल्वेमार्गावरही अंडरपास उभारण्यात आल्यास हजारो नागरिकांवर हा मोठा अन्याय ठरेल. नागरिकांना मूलभूत सुविधा व दळणवळणापासून वंचित ठेवण्याचा हा प्रकार असल्याने अंडरपासऐवजी रेल्वे ओव्हरब्रिजची उभारणी करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. आमदार विनोद अग्रवाल यांनी प्रस्तावित अंडरपासच्या जागेची पाहणी केली. तसेच रेल्वे ओव्हरब्रिज उभारण्यासाठी उपलब्ध विविध पर्यायांचा आणि जागेचा सविस्तर आढावा घेतला. या ठिकाणी तांत्रिकदृष्ट्या कोणत्या पद्धतीने ओव्हरब्रिज उभारता येईल, याची सर्वंकष तपासणी करून उपस्थित अधिकारी व अभियंत्यांच्या संयुक्त पथकाला दोन दिवसांत सर्वेक्षण अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.यावेळी आमदार विनोद अग्रवाल यांनी नागरिकांना आश्वस्त करत सांगितले की, या विषयाची गांभीर्याने दखल घेतली जाईल. सर्वेक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर लवकरच उच्चस्तरीय बैठक घेऊन या प्रश्नावर कायमस्वरूपी आणि समाधानकारक तोडगा काढण्यात येईल.

# पावसाळ्यात वरदान ठरेल 'काळी मिरी'; इम्युनिटी वाढेल, सर्दी-खोकल्यापासून देईल आराम, मेंदूसाठीही..

पावसाळ्यात वातावरणातील बदलांमुळे सर्दी, खोकला आणि संसर्गाचा धोका वाढतो. अशा वेळी स्वयंपाकघरातील काळी मिरी (Black Pepper) हा एक उत्तम आणि प्रभावी घरगुती उपाय ठरू शकतो. आयुर्वेदिक आणि युनानी चिकित्सा तज्ज्ञ डॉ. सलीम झैदी यांच्या मते, मर्यादित प्रमाणात काळ्या मिरीचे सेवन केल्यास पावसाळी आजारांपासून शरीराचे रक्षण होते.

काळ्या मिरीमध्ये 'पायपरिन' (Piperine) नावाचे सक्रिय घटक असते, ज्यामध्ये अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीऑक्सिडंट आणि अँटी-मायक्रोबियल गुणधर्म असतात. काळ्या मिरीचे आरोग्यदायी फायदे आणि तिच्या सेवनाची योग्य पद्धत सविस्तर जाणून घ्या.

**काळ्या मिरीचे आरोग्यदायी फायदे**

**१. सर्दी-खोकल्यापासून आराम**



पावसाळ्यात सर्दी, खोकला आणि घसा खवखवणे सामान्य आहे. ४ ते ५ काळ्या मिरीचे दाणे कुस्करून त्यात एक चमचा मध मिसळून खाल्ल्याने छातीतील कफ सुटा होतो आणि घशाला आराम मिळतो. यानंतर कोमट पाणी किंवा हलके गरम दूध पिणे फायदेशीर ठरते.

**२. पचनक्रिया सुधारते**

काळ्या मिरीमधील पायपरिन पोटात 'हायड्रोक्लोरिक ॲसिड'ची निर्मिती वाढवते. हे ॲसिड अन्नातील प्रोटीन आणि फॅट्स (चरबी) पचवण्यासाठी अत्यंत आवश्यक असते. यामुळे अपचन, गॅस आणि पोट फुगण्याच्या समस्येपासून आराम मिळतो.

**३. पोषक तत्वांचे शोषण वाढवते**

काली मिरी शरीरात इतर पोषक तत्वांचे शोषण वाढवण्यास मदत करते. विशेषतः हळदीमधील 'करक्युमिन' (Curcumin) चे शोषण पायपरिनमुळे अनेक पटींनी वाढते. याशिवाय व्हिटॅमिन C, बीटा-कॅरोटीन आणि सेलेनियमचा वापरही शरीराकडून योग्य प्रकारे केला जातो.

**४. फ्री रॅडिकल्स नियंत्रित करते**

काळ्या मिरीमधील अँटीऑक्सिडंट्स शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करतात, ज्यामुळे ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस (ताण) कमी होतो. दीर्घकाळात यामुळे हृदयविकार आणि इतर जुनाट आजारांचा धोका कमी होण्यास मदत होते.

**५. शरीराची सूज कमी करते**

पायपरिनच्या अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मांमुळे शरीरातील सूज वाढवणाऱ्या घटकांची सक्रियता कमी होते. यामुळे सांधेदुखी आणि सूज येण्याच्या त्रासात आराम मिळतो.

**६. मेंदूच्या आरोग्यासाठी फायदेशीर**

काही संशोधनानुसार, काळ्या मिरीचे सेवन मेंदूच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. हे मेंदूतील न्यूरॉन्स मधील संपर्क सुधारून स्मरणशक्ती, एकाग्रता आणि शिकण्याची क्षमता वाढवण्यास मदत करते.

काळ्या मिरीचे सेवन कसे करावे?

अन्नासोबत: वरण (डाळ), भाजी, सॅलड, सूप किंवा ताकामध्ये काळी मिरी पावडर मिसळून खाऊ शकता.

सकाळी: सकाळी कोमट पाण्यात एक चिमूटभर काळी मिरी पावडर टाकून पिऊ शकता.

हळदीसोबत: चांगल्या परिणामांसाठी हळदीसोबत काळ्या मिरीचे सेवन करावे, जेणेकरून शरीराला करक्युमिनचा पूर्ण फायदा मिळेल.

**कोणी काळजी घ्यावी?**

जरी काळी मिरी आरोग्यदायी असली, तरी खालील समस्या असलेल्या लोकांनी याचे सेवन जपून करावे किंवा टाळावे:

अल्सर आणि ॲसिडिटी: ज्यांना पोटात अल्सर किंवा तीव्र ॲसिडिटीचा त्रास आहे.

छातीत जळजळ: वारंवार छातीत जळजळ (Heartburn) होणाऱ्या लोकांनी मिरी टाळावी.

औषधोपचार: रक्त पातळ करण्याचे औषध घेणाऱ्या रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच याचे सेवन करावे.

इतर आजार: ब्लीडिंग डिसऑर्डर किंवा मूळव्याध (Piles) असलेल्या रुग्णांनी काळ्या मिरीपासून दूर राहावे.

महत्त्वाची टीप : ही माहिती सामान्य जागरूकतेसाठी आहे. काळी मिरी हा औषधाला पर्याय नाही. कोणताही जुनाट आजार किंवा तीव्र लक्षणे असल्यास (उदा. सततचा ताप, श्वास घेण्यास त्रास) त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# टोमॅटो खाल्ल्याने खरंच किडनी स्टोन होतो? जाणून घ्या यामागचे सत्य!

आपल्याकडे जेवणाची चव वाढवण्यासाठी टोमॅटोचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून लोकांमध्ये एक समज रूढ झाला आहे की, टोमॅटो किंवा त्याच्या बिया खाल्ल्याने किडनी स्टोन (खडा) होतो. विशेषतः किडनीशी संबंधित आजार असलेल्या रुग्णांना टोमॅटो खाण्यापासून रोखले जाते. पण या धारणेत खरंच कितपत तथ्य आहे? डॉक्टर्स आणि तज्ज्ञांच्या मते, हा निव्वळ एक गैरसमज (Myth) आहे.

टोमॅटो खाल्ल्याने खरंच किडनी स्टोन होतो या गैरसमजाचे मुख्य कारण काय?

या गैरसमजाचे मुख्य कारण टोमॅटोमध्ये आढळणारे 'ऑक्सालेट' (Oxalate) नावाचे तत्व आहे. किडनी स्टोनचा सर्वात सामान्य प्रकार हा 'कॅल्शियम ऑक्सालेट स्टोन' असतो. त्यामुळे लोकांना असे वाटते की टोमॅटो खाल्ल्याने थेट शरीरात खडा तयार होतो. परंतु, तज्ज्ञांच्या



मते टोमॅटोमधील ऑक्सालेटचे प्रमाण अत्यंत नगण्य (खूप कमी) असते. त्यामुळे सामान्य प्रमाणात टोमॅटो खाल्ल्याने किडनी स्टोनचा धोका अजिबात वाढत नाही.

या पदार्थांमध्ये असते जास्त ऑक्सालेट

युरोलॉजिस्ट (मूत्रविकार तज्ज्ञ) सांगतात की, टोमॅटोच्या तुलनेत इतर अनेक पौष्टिक पदार्थांमध्ये ऑक्सालेटचे प्रमाण खूप जास्त असते.

**विविध प्रकारचे नट्स (सुका मेवा)**

ज्या लोकांना वारंवार कॅल्शियम ऑक्सालेट स्टोन होण्याचा त्रास आहे, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने या पदार्थांच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असते. मात्र, हे पदार्थ आरोग्यासाठी फायदेशीर असल्याने ते आहारातून पूर्णपणे वगळू नयेत.

**संशोधनातून काय आले समोर?**

फक्त टोमॅटो खाल्ल्यामुळे किडनी स्टोन होतो, याचा कोणताही ठोस वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही.

शरीरात पाण्याचे प्रमाण कमी असणे आणि इतर चुकीच्या सवयी स्टोन होण्यासाठी जास्त कारणीभूत ठरतात.

कोणत्याही पौष्टिक अन्नाला डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय आहारातून पूर्णपणे बंद करणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

किडनी स्टोनपासून बचाव कसा करावा?

तज्ज्ञांच्या मते, किडनी स्टोन टाळण्यासाठी केवळ टोमॅटो बंद करणे हा उपाय नाही, तर खालील गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे:

# लठ्ठपणावरील औषधांमुळे वजन कमी होते; पण 'लाईफ क्वालिटी' सुधारत नाही! नवीन रिसर्चमध्ये काय आढळले?

जगभरात वाढत्या वयाबरोबर वाढता लठ्ठपणा ही एक मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे मागील काही वर्षांमध्ये लठ्ठपणा कमी करणाऱ्या औषधांची प्रचंड क्रेझ पाहायला मिळत आहे. मात्र आता नवीन संशोधन या औषधांच्या मर्यादा समोर आणत आहे. ही औषधे शरीरावरील चरबी नक्कीच कमी करू शकतात, परंतु मानसिक आरोग्य, कार्यक्षमता किंवा एकूणच जीवनशैलीत गुणात्मक सुधारणा घडवून आणण्यात ती अपयशी ठरत असल्याचे नवीन संशोधनात निदर्शनास आले आहे. जाणून घेऊया या संशोधनाविषयी...

**२६२ क्लिनिकल चाचण्यांचे विश्लेषण**

लठ्ठपणावरील औषधांचा शरीरावर नेमका कोणता परिणाम होतो याबाबत संशोधन झाले. वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या 'द बीएमजे'मध्ये हे संशोधन प्रकाशित झाले आहे. या संशोधनात सुमारे



१,००,००० सहभागी आणि १९ वेगवेगळया औषधांचा समावेश असलेल्या २६२ क्लिनिकल चाचण्यांचे विश्लेषण करण्यात आले.

**संशोधन कसे झाले?**

संशोधनात सहभागी झालेल्यांना त्यांच्या आरोग्याविषयी आणि राहणीमानाबद्दल प्रश्नावली देण्यात आली. त्यावरून संशोधकांनी 'केवळ जीवनशैली बदलणे' आणि 'वजन कमी करणारी औषधे घेणे' या दोन्ही गोष्टींची तुलना केली.

**संशोधनात काय आढळले?**

संशोधनात एक महत्त्वाची बाब समोर आली की, लठ्ठपणावरील औषधे घेऊन वजन कमी झाले, मात्र आरोग्याच्या दृष्टीने कोणताही लक्षणीय फरक पडला नाही. क्लिनिकल चाचण्यांमध्ये अभ्यासलेल्या सर्व उपचारांपैकी टिर्झेपेटाइड, मौंजारो आणि झेपबाउंडमधील सक्रिय घटक, तसेच कॅग्रीसेमा (सध्या वैद्यकीय वापरासाठी मंजूर नाही) यांनी जास्त वजन असलेल्या प्रौढांमध्ये शरीराच्या वजनात सर्वाधिक घट घडवून आणली. ओझेम्पिक आणि वेगोवीमध्ये वापरल्या जाणाऱ्या त्वचेखालील सेमाग्लुटाइडमुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी त्रासात घट होते, याचे सध्या सर्वात मजबूत पुरावे असल्याचेही या अभ्यासात नमूद आहे.

**वजन कमी करणाऱ्या औषधांचे दुष्परिणाम**

'टिर्झेपेटाइड' आणि 'सेमाग्लुटाइड' या दोन्ही औषधांमुळे शरीरातील 'लीन मास' (चरबी वगळता स्नायू आणि हाडांचे वजन) आरोग्यासाठी घातक ठरेल इतके कमी होते. शरीरातील स्नायू कमी झाल्यामुळे व्यक्ती अचानक पडणे, हाडे मोडणे आणि अकाली मृत्यू येण्याचा धोका वाढू शकतो, असे संशोधनात नमूद करण्यात आले आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

औषधांचे परिणाम तपासण्याचा कालावधी तुलनेने कमी होता. त्यामुळे या औषधांचे शरीरावर दीर्घकाळात नेमके काय परिणाम होतात, हे समजण्यासाठी अधिक संशोधनाची गरज आहे. तसेच जीवनमान मोजण्याच्या पद्धतींमध्ये फरक असल्याने निष्कर्ष समजून घेताना काळजी घेणे आवश्यक असल्याचा इशाराही तज्ज्ञांनी दिला आहे.

**जीवनमान ही एक गुंतागुंतीची बाब**

"जीवनमान ही प्रत्येक व्यक्तीनुसार बदलणारी आणि गुंतागुंतीची बाब आहे. केवळ वजन कमी होणे हा उपचाराच्या यशाचा एकमेव मापदंड ठरू शकत नाही," असे संशोधकांनी स्पष्ट केले.